दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–३०१ | शुक्रवार दि.२७ फेब्रुवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### अपघातानंतर जागे झालेले प्रशासन : हवाई सुरक्षेतील ढिलाईचा जीवघेणा पर्दाफाश

राज्याच्या राजकारणाला हादरवून टाकणाऱ्या अजित पवार यांच्या छोट्या विमान अपघातातील मृत्यूने केवळ एका नेत्याचा अंत झाला नाही, तर देशातील खासगी आणि चार्टर्ड हवाई प्रवासाच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्नही उभे केले. या दुर्दैवी घटनेनंतर नागरी विमान वाहतूक संचालनालयाने (डीजीसीए) संबंधित कंपनीच्या विमान उड्डाणांवर बंदी घालणे, विशेष सुरक्षा लेखापरीक्षणाचे आदेश देणे आणि नव्या नियमांची घोषणा करणे या हालचाली केल्या. वरवर पाहता या उपाययोजना योग्य आणि आवश्यक वाटतात; मात्र या सर्व हालचालींनी एक मूलभूत प्रश्न अधिक ठळक केला आहे.

## थोडक्यात...

### ‘व्हीएसआर’ विमानांवर शिवसेनेची बंदी!

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) नेते अजित पवार यांच्या विमान अपघाताने संपूर्ण राजकारण ढवळून निघाले आहे. या भीषण दुर्घटनेनंतर आता शिवसेना (शिंदे गट) सतर्क झाली असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. शिवसेना आता आपल्या पक्षीय कामासाठी किंवा नेत्यांच्या दौ–यांसाठी ‘व्हीएसआर’ कंपनीच्या विमानांचा आणि हेलिकॉप्टरचा वापर करणार नाही. ज्या ‘व्हीएसआर’ कंपनीच्या विमानाला अपघात झाला, त्या कंपनीच्या सुरक्षा मानकांबद्दल आणि तांत्रिक बाबींबद्दल सध्या मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### तिथे प्रफुल्ल पटेल यांचा तगडा संपर्क : पवार

मुंबई :अजित पवार यांच्या विमान अपघात प्रकरणात त्यांचे कुटुंबीय, राष्ट्रवादी पक्ष का लढत नाही यावर रोहित पवार यांनी रोखठोक मत मांडले. मी पवार कुटुंबातील आहे. परंतु, अजित पवार यांच्या कुटुंबाने जर माझ्याकडे सगळे पुरावे मागितले तर मी सगळी कागपत्रे त्यांना देईन, परंतु लढायला हवे, असे रोहित पवार म्हणाले. तसेच राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल यांच्या बाबतही रोहित पवार यांनी भाष्य केले.रोहित पवार हे आज बारामतीमध्ये अजित पवार यांच्या घातपाती मृत्यूबाबत एफआयआर दाखल करण्याच्या मागणीसाठी पोलिस ठाण्यात आले होते.

### भारत–बांगलादेश पुन्हा बससेवा पुन्हा सुरु

ढाका : भारत आणि बांगलादेश यांच्यातील बिघडलेले संबंध आता पुन्हा रुळावर येताना दिसत आहेत. बांगलादेशात राजकीय सत्तापालट होऊन बांगलादेश नॅशनल पार्टी सत्तेत आल्यानंतर, गेल्या १८ महिन्यांपासून बंद असलेली आंतरराष्ट्रीय मैत्री बस सेवा अखेर मंगळवार, २४ फेब्रुवारी २०२६ रोजी पुन्हा सुरू झाली. या निर्णयामुळे दोन्ही देशांतील नागरिकांना, विशेषत: ईशान्य भारतातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे.ऑगस्ट २०२४ मध्ये शेख हसीना सरकार कोसळल्यानंतर बांगलादेशात निर्माण झालेल्या अस्थिरतेमुळे ही बस सेवा खंडित करण्यात आली होती.

### मुख्यमंत्र्यांच्या हस्ते १,२९० वाहनांचे लोकार्पण

मुंबई : मुंबई आणि महानगर परिसरात घडलेल्या गुन्ह्याच्या ठिकाणी जलद गतीने पोहोचणे, १०० आणि ११२ या हेल्पलाईन क्रमांकावर आलेल्या तक्रारीच्या कॉलवर विनाविलंब पोहोचणे यासाठी मुंबई पोलिस दलात १२९० नवीन वाहनांचा समावेश करण्यात आला आहे.नरिमन पॉईंट येथील मुरली देवरा चौकात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून आज या वाहनांचे लोकार्पण करण्यात आले. कार्यक्रमाला राज्यमंत्री योगेश कदम, पोलिस आयुक्त देवेन भारती, पोलिस सह आयुक्त जयकुमार यांच्यासह पोलिस दलातील अधिकारी उपस्थित होते.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२५ फेब्रुवारी २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ११९.०० क्विंटल | १,९४५ | २,९५१ | २,३६४ |
| ज्वारी/हायब्रिड :५५.५० क्विंटल | १,६५० | ४,५५१ | ३,२३५ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १५.०० क्विंटल | ६,६५० | ७,६७१ | ७,३४१ |
| उडीद : १.५० क्विंटल | ४,२०० | ४,२०० | ४,२०० |
| बाजरी: ३१.०० क्विंटल | २,११० | ३,२०१ | २,७१६ |
| मुग: १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| सोयाबीन: १४.५० क्विंटल | ५,२५० | ५,२५० | ५,२५० |
| हरभरा: ४२.०० क्विंटल | ४,९०० | ५,१४० | ५,००८ |

# २०१९ नंतर जमीन खरेदी केलेल्या शेतकऱ्यांनाही पीएम–नमोचा लाभ

## निकष बदलासाठी राज्याचा केंद्राकडे पाठपुरावा

मुंबई । प्रतिनिधी



**प्रधानमंत्री किसान सन्मान निधी आणि राज्याच्या नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेतून आतापर्यंत वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. १ फेब्रुवारी २०१९ नंतर जमीन खरेदी केलेल्या शेतकऱ्यांचाही या योजनांमध्ये समावेश व्हावा, यासाठी राज्य सरकार केंद्राकडे पाठपुरावा करत असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. त्यामुळे पात्रतेचे निकष बदलण्याची शक्यता व्यक्त होत आहे.**

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी ही केंद्र पुरस्कृत योजना असून २१ जून २०१९ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात तिची अंमलबजावणी सुरू झाली. या योजनेअंतर्गत पात्र शेतकरी कुटुंबांना वर्षातून तीन हप्त्यांत प्रत्येकी २ हजार रुपये, असे एकूण ६ हजार रुपये थेट लाभ हस्तांतरण () पद्धतीने त्यांच्या बँक खात्यात जमा केले जातात. याच धर्तीवर राज्य शासनाने नमो शेतकरी महासन्मान निधी योजना सुरू केली असून राज्याकडूनही अतिरिक्त आर्थिक मदत दिली जाते. मात्र केंद्र शासनाने लाभार्थी पात्रता निश्चित करण्यासाठी १ फेब्रुवारी २०१९ ही अंतिम (कट–ऑफ) तारीख निश्चित केली आहे. या तारखेनंतर ज्यांनी खरेदीखत, वाटणीपत्र किंवा देणगीपत्राद्वारे लागवडयोग्य जमीन आपल्या नावावर घेतली आहे, ते शेतकरी सध्या या योजनेच्या कक्षेबाहेर आहेत. कारण संबंधित व्यक्ती त्या कट–ऑफ तारखेला जमीन मालक नव्हती. तसेच ज्यांनी आपली जमीन विकली आहे, ते मूळ जमीनमालकही लाभासाठी अपात्र ठरतात. या निकषामुळे राज्यातील हजारो नवीन जमीनधारक शेतकरी योजनांच्या लाभापासून वंचित राहिले आहेत. बदलत्या परिस्थितीत वारसा, खरेदी–विक्री किंवा कौटुंबिक वाटणीमुळे नवीन जमीनधारकांची संख्या वाढली असून त्यांनाही आर्थिक सहाय्याची गरज असल्याचे राज्य सरकारचे मत आहे. याच पार्श्वभूमीवर पात्रतेचे निकष शिथिल करून २०१९ नंतर जमीन खरेदी केलेल्या शेतकऱ्यांचा समावेश करण्याबाबत राज्य सरकार केंद्राशी सातत्याने पाठपुरावा करत आहे. मात्र सध्या तरी लाभार्थी निश्चिती ही मार्गदर्शक सूचनांनुसारच ◀◀ पान २ वर

# अखेर सुनेत्रा पवार राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी

मुंबई । प्रतिनिधी



**अजित पवारांमुळे राज्यात आणि देशात आपली ओळख निर्माण झाली होती,असे म्हणत राष्ट्रवादीचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल पटेल यांनी अजित पवारांच्या आठवणींना उजाळा दिला. तसेच, राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्षाच्या बैठकीत सुनेत्रा पवारच राष्ट्रीय अध्यक्ष असल्याची घोषणाही करण्यात आली आहे. पटेल यांनी पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत याबाबतचा प्रस्ताव मांडला, त्याला सर्वानुमते सहमती दर्शवण्यात आली. दरम्यान, पार्थ पवार यांच्याकडेही मोठी जबाबदारी देण्यात येणार असल्याची माहिती आहे.** ◀◀ पान २ वर

### तर माझं नाव कुणालाच कळलं नसतं–धनंजय मुंडे

माझा प्रदीर्घ सहवास नसला तरी १५ वर्ष मी अजितदादा यांच्यासोबत होतो. २०१४ साली मला त्यांनी विरोधी पक्षनेते पद दिलं होतं. ज्यावेळी आपण विरोधात होतो, अनेक मान्यवर त्यावेळी होते. जबाबदारी सांभाळणारे अनेक दिग्गज होते. परंतू, तरीदेखील मला संधी देण्यात आली. ती मिळाली नसती तर माझं नाव कुणाला कळल नसतं असे मत धनंजय मुंडे यांनी व्यक्त केले. २०१४ ते २०१९ पाच वेळा यात्रा निघाल्या. हे फक्त त्याच काळात झालं. २०१९ मधे संख्या वाढली. आज दादा आपल्या सोबत नाहीत. आज वहिनी तुमच्यात आम्ही दादांना पाहत आहोत असे मुंडे म्हणाले.

### कोणत्याही घटकाला वाऱ्यावर सोडणार नाही–सुनेत्रा पवार

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर सुनेत्रा पवार यांनी पक्षाच्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना उद्देशून भाषण केलं. आजचा प्रसंग माझ्यासाठी वेदना आहे, हा क्षण माझ्यासाठी लाखो कार्यकर्त्यांची जबाबदारी स्वीकारणारा आहे. मी पक्षाचा विचार पुढे घेऊन जाण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करेल.राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा माझा परिवार असून समाजातील कोणत्याही घटकाला मी वाऱ्यावर सोडणार नाही, असे म्हणत सुनेत्रा पवार यांनी सर्व समाजाला सोबत घेऊन आपण पुढे जाणार असल्याचे स्पष्ट केले.

## कॅबिनेटमध्ये शिक्कामोर्तब; जि.प अन् पं समध्ये स्वीकृत सदस्य

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील महापालिका आणि नगरपालिका निवडणुकांचा निकाल लागल्यानंतर तेथे स्वीकृत नगरसेवकांची निवड करण्यात आली आहे. संख्याबळाच्या आधारावर पक्षांना हे स्वीकृत नगरसेवकपद मिळाले आहेत. त्यातच, नुकतेच जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकाही पार पडल्या असून आता जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्येही स्वीकृत सदस्य असणार आहेत. राज्य मंत्रिमंडळात या निर्णयावर शिक्कामोर्तब झाल्याची सूत्रांची माहिती आहे. जिल्हा परिषदेत सदस्य संख्येच्या १० टक्के तर पंचायत समितीत सदस्य संख्येमागे २० टक्के सदस्य निवडता येणार असल्याची माहिती आहे. राज्य मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयानुसार जिल्हा परिषदेत सदस्य संख्येच्या १० टक्के तर ◀◀ पान २ वर

## गोळा केलेले पुरावे सुपूर्द केले–रोहित पवार

पुणे। प्रतिनिधी



**सीआयडी कार्यालयात भेट दिल्यानंतर आमदार रोहित पवार यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले की, ‘‘डीजीसीएने या विमान अपघातासाठी ’व्हीएसआर कंपनीला जबाबदार धरले आहे. जेव्हा २४ फेब्रुवारीला हा अहवाल समोर आला, तेव्हा मी स्वत: मुंबईला जाऊन गुन्हा दाखल करण्याची विनंती केली होती. मात्र, तिथे आमचा एफआयआर नोंदवून घेण्यात आला नाही.**

रोहित पवार पुढे म्हणाले, ‘‘आज मी बारामतीला गेलो होतो. तिथेही तीन तास आणि मुंबईतही तीन तास बसून राहिलो, तरीदेखील आमचा एफआयआर घेतला गेला नाही. खरंतर एफआयआर दाखल करून घेणे हा आमचा ◀◀ पान २ वर

## विमान दुर्घटना : घातपात आढळल्यास गुन्हा दाखल करणार, सीआयडी

पुणे । प्रतिनिधी

अजित पवारांच्या विमान अपघाताची चौकशी करण्याची मागणी सर्व स्तरांतून होत आहे. आमदार रोहित पवार यांनीही यासंदर्भात मागणी केली आहे. त्यांनी व्हीएसआर विमान कंपनीवर गुन्हा दाखल करण्यासाठी आक्रमक पवित्रा घेतला आहे. दरम्यान, आज अजित पवारांच्या विमान अपघाताच्या तपासप्रकरणी पुण्यात सीआयडीने पत्रकार परिषद घेतली. यावेळी सीआयडी अधिकाऱ्यांनी अजित पवार यांच्या विमान अपघाताचा तपास योग्य दिशेने सुरू आहे; तपासात घातपात आढळल्यास गुन्हा दाखल करण्यात येईल असे स्पष्ट केले .

‘‘बारामती येथील विमान दुर्घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन विमानातील अजित पवार व अन्य व्यक्तींच्या आकस्मिक मृत्यूचा तपास पोलिस स्टेशन बारामती येथे कलम १९४ बीएनएसएस अंतर्गत नोंद करण्यात आला होता. त्यानंतर हा तपास पोलिस महासंचालकांनी सीआयडीकडे वर्ग केला आहे. सध्या हा तपास सीआयडी करत आहे. सदर तपास पोलीस अधीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. या मृत्यूमागे घातपात आहे का, हा तपासाचा मुख्य उद्देश आहे. त्यानंतर गुन्हेगारी निष्काळजीपणा आहे का, हा तपासाचा भाग आहे. तिसरा मुद्दा म्हणजे या प्रकरणात कोणते गुन्हेगारी कृत्य घडले आहे का, हेही तपासले जात आहे. ◀◀ पान २ वर

## २० मार्चपूर्वी अध्यक्ष व सभापतींची निवडणूक

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या अध्यक्षपद व सभापतीपदाच्या निवडणुका २० मार्चपूर्वी होणार आहेत. ग्रामविकास विभागाने याबाबतचे आदेश जारी केल्याने आता राजकीय घडामोडींना व राजकीय समीकरणाच्या मांडणीला वेग येणार आहे.**

राज्यातील १२ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत येणा–या १२५ पंचायत समित्यांची निवडणूक ७ फेब्रुवारी रोजी होऊन ९ फेब्रुवारीला निकाल जाहीर झाले आहेत. परंतु जिल्हा परिषद अध्यक्षांची, तसेच पंचायत समित्यांच्या सभापती पदांची निवडणुक कधी होणार याबाबत उत्सुकता होती. अखेर ग्रामविकास विभागाने गुरुवारी याबाबतचे आदेश जारी करून २० मार्चपूर्वी पहिली बैठक घेण्याचे निर्देश जिल्हाधिका–यांना दिले आहेत. महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या अधिनियम मधील कलम ११(१) व ५९(१) नुसार निवडून आलेल्या सदस्यांचा कार्यकाळ हा पहिल्या बैठकीपासून सुरू होतो.रायगड, रत्नागिरी, ◀◀ पान २ वर

## अधिकृत आधार केंद्र आता गुगल मॅपवर यूआयडीएआय आणि गुगलची भागीदारी

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

अधिकृत आधार केंद्रांच माहिती आता गुगल मॅपवर पाहायला मिळणार आहे. आता जवळच्या आधार केंद्राचा पत्ता आणि उपलब्ध सेवा गुगल मॅपवर सापडतील. अधिकृत आधार केंद्रे गुगल मॅप्सवर प्रदर्शित करण्यासाठी युनिक आयडेंटिफिकेशन अथॉरिटी ऑफ इंडिया आणि गुगलने भागीदारी केली आहे.

गुगल आणि यूआयडीएआयमधील सहकार्याच्या पुढील टप्प्यात यूआयडीएआय केंद्राची माहिती व्यवस्थापित करण्यासाठी आणि लोकांच्या अभिप्रायाला थेट प्रतिसाद देण्यासाठी गुगल व्यवसाय प्रोफाइलचा वापर करेल. भविष्यात, भागिदारी गुग नकाशे इंटरफेसद्वारे थेट ◀◀ पान २ वर

## मुख्यमंत्र्यांनी दोन तासाच्या भाषणात हिंदीसक्ती दावोस, टिपू सुलतान ते अर्थव्यवस्था सगळंच काढलं

मुंबई । प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपालांच्या अभिभाषणावर सभागृहात चर्चा केली. यावेळी, राज्यातील विविध मुद्द्यांवर त्यांनी आपली भूमिका मांडली. त्यामध्ये, टीपू सुलताना, दावोस करार, विरोधकांचे आरोप, एबीसीची रेड, नरहरी झिरवाळ प्रकरण, मराठी शाळा, हिंदी–मराठी भाषेसह अनेक विषयांवर चर्चा केली. विरोधी पक्ष हा भ्रमित आणि संभ्रमित आहे, असे दिसते. माझी त्यांना सूचना आहे की, भ्रमात राहून धावण्यापेक्षा संभ्रमातून बाहेर पडण्यासाठी शांतपणे विचार करुन मुद्दे मांडले पाहिजेत. जेणेकरुन महाराष्ट्राच्या हितात तुमचे योगदान वाढेल. ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था, विकसित भारत, महाराष्ट्राची वाटचाल, दावोस करारासंदर्भातही स्पष्टीकरण दिले. ◀◀ पान २ वर



# न्यायालयातील भ्रष्टाचारासंबंधीचा धडा वगळणार

## आठवीच्या पुस्तकाची विक्री थांबवली?

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँड ट्रेनिंग अर्थात एनसीईआरटीने प्रकाशित केलेल्या इयत्ता आठवीच्या सामाजिक शास्त्राच्या पाठ्यपुस्तकातील एका धड्यावरून वाद निर्माण झाला आहे. इयत्ता आठवीच्या पुस्तकात ‘समाजातील न्यायपालिकेची भूमिका’ या धड्याचा समावेश करण्यात आला असून यामध्ये ‘न्यायपालिकेतील भ्रष्टाचार’ या विषयाचा समावेश करण्यात आल्याने गोंधळ उडाला आहे.**



याबाबत भारताचे सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी देखील तीव्र आक्षेप घेत नाराजी व्यक्त केली आहे. ‘कोणालाही संस्थेची (न्यायपालिका) बदनामी करू देणार नाही’, असं सूचक भाष्य करत सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी आपली नाराजी व्यक्त केली. दरम्यान, यानंतर आता या एनसीईआरटीच्या आठवीच्या पुस्तकातील वादानंतर मोठी अपडेट समोर आली आहे. एनसीईआरटीच्या आठवीच्या पुस्तकातील ‘समाजातील न्यायपालिकेची भूमिका’ यातील न्यायालयातील भ्रष्टाचाराबाबतचा संदर्भ किंवा धडा वगळण्यात येण्याची शक्यता आहे. तसेच या पुस्तकाची बाजारातील विक्री थांबवत एनसीईआरटीने हे पुस्तक बाजारातून पाठिमागे मागवल्याची माहिती समोर आल्याचे वृत्त सूत्रांच्या हवाल्याने इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. या पुस्तकातील धड्यावरून झालेल्या ◀◀ पान २ वर

### धड्यात कोणत्या मुद्यांचा समावेश?

आठवीच्या पुस्तकातील या धड्यात न्यायव्यवस्थेसमोरील आव्हानांचा समावेश आहे. न्यायव्यवस्थेमध्ये विविध स्तरांवर होणारा भ्रष्टाचार आणि प्रलंबित खटल्यांबाबत चिंता व्यक्त करण्यात आली. तसेच, खटल्यांच्या विलंबासाठी न्यायाधीशांची अपुरी संख्या, किचकट कायदेशीर प्रक्रिया आणि अपु–या पायभूत सुविधा अशा कारणांचा समावेश केला आहे.

### न्यायालयातील प्रलंबित खटले

पुस्तकात सर्वोच्च आणि उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या खटल्यांची माहिती देण्यात आली आहे. पुस्तकात दिलेल्या आकडेवारीनुसार, सर्वोच्च न्यायालयात अंदाजे ८१,००० खटले, उच्च न्यायालयात ६२,४०,००० खटले तर, जिल्हा आणि कनिष्ठ न्यायालयात तब्बल ४,७०,००,००० (४.७ कोटी) खटले प्रलंबित असल्याचे म्हटले आहे.

## एसटीच्या उत्पन्नात दररोज दीड कोटीचे नुकसान

मुंबई । प्रतिनिधी

**सगळ्यांना आवडणारा प्रवास म्हणजे लालपरीचा प्रवास. खेड्यापाड्यांत पोहोचलेली लालपरी दिवसेंदिवस तोट्यात चालली आहे. यामुळे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची आर्थिक स्थिती दिवसेंदिवस खालावत चालली आहे. सध्या एसटीचा दैनंदिन खर्च ३४ ते ३५ कोटी रुपये, तर उत्पन्न ३३ कोटी रुपये आहे. दररोजची तूट एक ते दीड कोटी रुपयांच्या घरात आहे. परिणामी, महामंडळावर आर्थिक दडपण वाढले आहे. यातून सावरण्यासाठी नवनवीन प्रयोग हाती घेतले जात आहेत.**

उत्पन्न कमी होण्यात बसेसची कमतरता हा मुख्य अडथळा सांगितला जातो. वर्षभरात ८,३०० नवीन बसेस खरेदी करून तो दूर करण्याचा महामंडळाचा प्रयत्न आहे. कोरोना महामारीपूर्वी महामंडळाकडे १८ ते १९ हजार बसेस होत्या. दररोज सुमारे ६६ लाख प्रवासी एसटीने प्रवास करत होते. मागील चार–पाच वर्षांत बस खरेदी रखडली. २०२४ अखेर बसेसची संख्या घटून ◀◀ पान २ वर

अग्रलेख

# अपघातानंतर जागे झालेले प्रशासन : हवाई सुरक्षेतील ढिलाईचा जीवघेणा पर्दाफाश

राज्याच्या राजकारणाला हादरवून टाकणाऱ्या अजित पवार यांच्या छोट्या विमान अपघातानंतर मृत्यूने केवळ एका नेत्याचा अंत झाला नाही, तर देशातील खासगी आणि चार्टर्ड हवाई प्रवासाच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्नही उभे केले. या दुर्दैवी घटनेनंतर नागरी विमान वाहतूक संचालनालयाने (डीजीसीए) संबंधित कंपनीच्या विमान उड्डाणांवर बंदी घालणे, विशेष सुरक्षा लेखापरीक्षणाचे आदेश देणे आणि नव्या नियमांची घोषणा करणे या हालचाली केल्या. वरवर पाहता या उपाययोजना योग्य आणि आवश्यक वाटतात; मात्र या सर्व हालचालींनी एक मूलभूत प्रश्न अधिक ठळक केला आहे. हे नियम आणि तपासणी आधी का नव्हते किंवा प्रभावीपणे का राबवले गेले नाहीत?

हवाई प्रवास हा आजच्या काळात केवळ चैनीचा विषय राहिलेला नाही. उद्योग, प्रशासन, राजकारण आणि सर्वसामान्य प्रवाशांसाठीही तो दैनंदिन जीवनाचा महत्त्वाचा भाग बनला आहे. विशेषतः राज्यातील दुर्गम भागांना जलद जोडणी देण्यासाठी चार्टर्ड आणि खासगी विमान सेवा मोठ्या प्रमाणावर वापरली जाते. राजकीय नेत्यांसाठी वेळेची बचत, तर उद्योगपतींसाठी व्यावसायिक सुलभता यामुळे या सेवांना मागणी वाढली आहे. युवा पिढीदेखील वेळेच्या निकडीमुळे हवाई प्रवासाला प्राधान्य देत आहे. अशा परिस्थितीत सुरक्षिततेचा प्रश्न हा केवळ तांत्रिक मुद्दा नसून सार्वजनिक विश्वासाचा मुद्दा बनतो.

डीजीसीएने नव्याने जाहीर केलेल्या नियमांनुसार खासगी आणि चार्टर्ड विमान कंपन्यांना त्यांच्या विमानांचे वय, देखभाल नोंदी आणि वैमानिकांचा अनुभव सार्वजनिक करणे बंधनकारक करण्यात आले आहे. हे पाऊल पारदर्शकतेच्या दृष्टीने स्वागतार्ह असले, तरी याच गोष्टी आधीपासून बंधनकारक का नव्हत्या, असा प्रश्न उपस्थित होतो. विमानासारख्या अत्यंत संवेदनशील वाहतूक साधनाच्या बाबतीत देखभाल, तांत्रिक तपासणी आणि वैमानिकांची पात्रता या गोष्टी नियमित आणि काटेकोर असणे अपेक्षित आहे. जर अपघातानंतरच या उणिवा लक्षात येत असतील, तर ते केवळ संबंधित कंपनीचे अपयश नसून नियामक यंत्रणेच्या देखरेखीवरही प्रश्नचिन्ह निर्माण करते.

या घटनेनंतर विविध राजकीय नेत्यांनी आणि तज्ज्ञांनी अपघाताच्या कारणांबाबत शंका व्यक्त केल्या आहेत. काहींनी घातपाताची शक्यता व्यक्त केली, तर काहींनी तांत्रिक त्रुटींवर बोट ठेवले. सरकारने सीबीआय चौकशीची घोषणा केली आहे, तर डीजीसीएने सुरक्षा लेखापरीक्षण सुरू केले आहे. मात्र, देशातील जनतेचा अनुभव असा आहे की चौकशी समित्या, अहवाल आणि शिफारशी अनेकदा कागदापुरत्याच मर्यादित राहतात. दोषींवर ठोस कारवाई आणि प्रणालीगत सुधारणा झाल्याचे उदाहरण कमीच दिसते. त्यामुळेच अशा चौकशींच्या विश्वासार्हतेबाबत जनमानसात संशय निर्माण होणे स्वाभाविक आहे.

अलीकडच्या काळात खासगी विमान कंपन्यांच्या कारभाराबाबतही प्रश्न उपस्थित झाले आहेत. प्रवाशांशी मनमानी वर्तन, अचानक उड्डाणे रद्द करणे किंवा तांत्रिक कारणांमुळे विलंब होणे या घटना वारंवार घडतात. या पार्श्वभूमीवर नियामक संस्थेची भूमिका केवळ नियम जाहीर करण्यापुरती मर्यादित नसून त्यांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्याची आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कंपन्यांवर कठोर कारवाई झाली, तरच इतरांसाठी तो धडा ठरेल.

या अपघाताने आणखी एक वास्तव अधोरेखित केले आहे तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले तरी मानवी निष्काळजीपणा, अपुरी देखभाल किंवा नियमनातील त्रुटी यामुळे मोठ्या दुर्घटना घडू शकतात. त्यामुळे नियमित सुरक्षा तपासणी, स्वतंत्र लेखापरीक्षण आणि पारदर्शक अहवाल प्रणाली अत्यावश्यक आहे. केवळ अपघातानंतरच तपासणी करण्याची पद्धत बदलून प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यावर भर देणे ही काळाची गरज आहे.

हवाई प्रवासावर विश्वास टिकवणे ही सरकार आणि नियामक यंत्रणेसमोरील सर्वांत मोठी जबाबदारी आहे. कारण प्रत्येक अपघात हा केवळ आकडा नसतो; तो एखाद्या कुटुंबासाठी अपूरा होणारा आघात असतो. अजित पवार यांच्या मृत्यूने राज्याला मोठी राजकीय आणि भावनिक हानी पोहोचली आहे. मात्र, या घटनेतून धडा घेऊन संपूर्ण हवाई सुरक्षा प्रणाली अधिक मजबूत करण्याची संधीही उपलब्ध झाली आहे.

सरकारने आणि डीजीसीएने केवळ नियम जाहीर करून थांबता कामा नये. त्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी, नियमित तपासणी, दोषींवर कठोर कारवाई आणि सर्वसामान्य प्रवाशांना माहिती देण्याची पारदर्शक व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे. कारण हवाई प्रवास हा केवळ सोयीचा पर्याय नसून नागरिकांच्या जीवाशी थेट संबंधित विषय आहे. करदात्यांच्या पैशातून चालणाऱ्या यंत्रणांनी त्यांच्या सुरक्षिततेची हमी देणे हा त्यांचा मूलभूत हक्क आहे आणि त्या हक्काची पूर्तता करणे हीच खरी प्रशासनाची कसोटी ठरणार आहे.

# विद्यार्थ्यांच्या कलागुणांनी जिंकली प्रेक्षकांची मने, बक्षीसापोटी जमली ४० हजाराची रक्कम

**अंबड । प्रतिनिधी**

**तालुक्यातील नुतन वसाहत पिठोरी सिरसगाव जि.प.प्रा.शाळेच्यावतीने आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम मोठ्या उत्साहात तसेच गावकऱ्यांच्या प्रचंड प्रतिसादात संपन्न झाला.यावेळी विद्यार्थ्यांच्या प्रत्येक नृत्याला दाद देत गावकऱ्यांनी दिलेल्या बक्षिसापोटी शाळेला ४० हजार रुपयांची रक्कम जमा झाली.**



या कार्यक्रमाचे उदघाटन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते झाले. सरपंच कृष्णा भाऊ आटोळे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष राजेंद्र भाऊ पवार, शिक्षण विस्तार अधिकारी श्री दिनेश शिनगारे, केंद्रप्रमुख श्री दत्ता भापकर, श्री झांबरे सर, भाजपा युवा नेते विजय खटके,वंचित बहुजन आघाडी तालुकाध्यक्ष किशोर तुपे, शिवसेना (उ.बा.ठा.) तालुकाप्रमुख बाळासाहेब गावडे, आदर्श शिक्षक राजू छल्लारे, माजी सरपंच रामेश्वर माने, राष्ट्रवादीचे युवा नेते जगन्नाथ उढाण, भाजप तालुकाध्यक्ष प्रेमानंद उढाण, श्री अर्जुन येवले, श्री बाबू मुळे, ग्रामपंचायत सदस्य गणेश काकडे, प्रकाश खारतुडे, संतोष खारतुडे, ग्रामसेवक श्री.चव्हाण, संभाजी खोमणे,शांतीलाल खारतुडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविकात मुख्याध्यापक अशोक शिंदे यांनी कार्यक्रमाचा उद्देश तसेच शाळेच्या गुणवत्तेची माहीती दिली.सुत्रसंचालन मुख्याध्यापक अशोक शिंदे यांनी तर आभार प्रदर्शन शिक्षक सुनिल जोगदंड यांनी केले. या रंगतदार कार्यक्रमास मोठ्या संख्येने सहभागी होत गावकऱ्यांनी आनंद घेतला.विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांनी पालकांची मने जिंकून घेतली.उत्कृष्ट सांस्कृतिक कार्यक्रमाबद्दल उपस्थितांनी सांस्कृतिक कार्यक्रमाचे प्रमुख श्री.काकासाहेब नलवडे यांचे विशेष कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक अशोक शिंदे,शिक्षक सुनील जोगदंड, काकासाहेब नलवडे आदींनी परिश्रम घेतले.यावेळी विद्यार्थी व ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# पाथर्डी शहरातील छत्रपती ते बाबासाहेब पुतळ्यांना सुरक्षा कवच देण्याची मागणी

**पाथर्डी । प्रतिनिधी**

पाथर्डी शहरातील प्रमुख सर्व महान विभूती असलेल्या पुतळ्यांचे संरक्षण व पावित्र्य अबाधित राहावे यासाठी शहर व तालुक्यातील सर्वच पुतळ्याभोवती सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची मागणी नगरसेविका दिपाली बंग व माजी नगरसेवक रामनाथ बंग यांनी आ.मोनिका राजळे यांच्याकडे केली आहे,याबाबत माहिती देताना रामनाथ बंग म्हणाले शहरांमध्ये हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक लोकनेते गोपीनाथ मुंडे संघर्षयोद्धा बबनराव ढाकणे यांचे पुतळे आहेत शहराचे विस्तारीकरण मोठ्या प्रमाणावर झाले असून पुतळ्यांचा सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे यापूर्वी शहरात पुतळ्याच्या विटंबनेवरून किरकोळ प्रकार घडले मात्र नागरिकांच्या सामंजस्याने मोठा अनर्थ घडला नाही,मात्र विकृत प्रवृत्ती अथवा नकारात्मक व्यक्तींकडून



अशा पुतळ्यांबाबत काही चुकीचा प्रकार घडल्यास यामध्ये निरअपराध लोकांना व्यर्थ त्रास होणार आहे शहरातील जातीय व धार्मिक सलोखा उत्तम असून कुठल्याही प्रकारची तणावाचे वातावरण नाही मात्र येणाऱ्या काळात सामाजिक सुरक्षा जातीय सलोखा व धार्मिक एकात्मता टिकून राहावी म्हणून पालिकेने सर्वच पुतळ्यांभोवती उच्च दर्जाचे सीसीटीव्ही कॅमेरे बसवून पुतळ्यांचे पावित्र्य व सुरक्षा अबाधित ठेवण्यासाठी पुढाकार घ्यावा याप्रसंगी आमदार निधीतून यासाठी निधीची उपलब्धता करून द्यावी मात्र लवकरात लवकर पुतळ्यांभोवती सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत त्या संबंधीचे आदेश नगराध्यक्ष अभय आव्हाड व पालिकेचे मुख्याधिकारी संतोष लांडगे यांना देण्याची मागणी रामनाथ बंग यांनी केली आहे पुतळ्यांभोवती सुशोभीकरण आकर्षक विद्युत रोषणाई व तेथे येणाऱ्या लोकांना बसण्यासाठी बाके मांडण्यात यावीत शहराच्या सौंदर्यात भर पडून विविध विभागातील ज्येष्ठ नागरिक व मुलाबाळांना पुतळ्यांच्या परिसरामध्ये प्रसन्न चित्ताने वावरता येईल लिटल गार्डन उभारावे यासाठी आ.मोनिका राजळे यांनी या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करण्याची गरज असल्याचे रामनाथ बंग म्हणाले शहरातील पुतळ्यांच्या संरक्षणाबाबत पाथर्डी पोलिसांनी यापूर्वीच पालिकेला देखील पत्र दिले आहे आशा स्वरूपाचीच मागणी नगरसेवक देवा पवार व बाळासाहेब सोनटक्के यांनीही पाथर्डी नगरपालिका प्रशासनाकडे केली आहे.

# भगवान बाबा प्रतिष्ठान येथे वंजारी समाजाचा रविवारी वधु-वर राज्यस्तरीय परिचय मेळावा

**बीड । प्रतिनिधी**

**मातृभूमी प्रतिष्ठान संचलित, अखिल भारतीय संत भगवानबाबा वंजारी समाज वधु-वर नोंदणी महासंघ तथा वंजारी विश्व वधु-वर, श्री संत भगवान बाबा सामाजिक प्रतिष्ठान, वंजारी परिवार, वंजारी समाज महाराष्ट्र वार्षीक अंक छत्रपती संभाजीनगरच्या वतीने १८ वा राज्यस्तरीय सर्व शाखीय वंजारी वधु-वर परिचय मेळावा तसेच मातृभूमी राज्यस्तरीय आदर्शरत्न पुरस्काराने गौरव करण्यात येणार आहे. रविवार दि.१ मार्च २०२६ रोजी सकाळी १० ते सायं.५ दरम्यान डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे सदरील मेळवा संपन्न होणार होता, परंतु प्रशासकीय कारणाने सदरील मेळावा हा याच दिवशी श्रीसंत भगवानबाबा सामाजिक प्रतिष्ठान, बार्शी रोड, बीड येथे आयोजित करण्यात आला आहे. या सर्व कार्यक्रमास समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन मातृभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.संजय तांदळे यांनी केले आहे.**

मातृभूमी प्रतिष्ठानच्यावतीने आयोजित कार्यक्रमाचे उद्घाटन महंत ह.भ.प.राधाताई महाराज आईसाहेब यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ह.भ.प.मोहन महाराज खरमाटे हे असणार आहेत तर प्रमुख पाहुणे म्हणून कल्पतरु प्रतिष्ठानच्या सचीव डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्यासह आदी मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाच्या सकाळच्या प्रथम सत्रामध्ये सकाळी १०.३० ते १२.३० या कालावधीत वंजारी समाज महाराष्ट्र वार्षिक अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते संपन्न होणार असून त्यानंतर शैक्षणिक, संशोधन, कला, क्रीडा, साहित्य, कीर्तन, सांस्कृतिक, शौर्य, योगा, आरोग्य, राजकीय, सामाजिक, प्रशासन, पत्रकारिता, स्पर्धा परिक्षा सह आदी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य केलेल्या मान्यवरांना मातृभूमी राज्यस्तरीय आदर्शरत्न पुरस्काराने गौरव करण्यात येणार आहे. त्याचबरोबर सकाळी पहिल्या सत्रात कार्यक्रमस्थळी सकाळी ०९ ते ०१ या दरम्यान वधू-वर नोंदणी करण्यात येणार आहे. तर दुसऱ्या सत्रामध्ये दुपारी १२.३० ते १.३० वा. स्नेहभोजन त्यानंतर दुपारी १.३० ते ५.३० या कालावधीत वधु-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. मातृभूमी प्रतिष्ठान संचलित, अखिल भारतीय संत भगवानबाबा वंजारी समाज वधु-वर नोंदणी महासंघ तथा वंजारी विश्व वधु-वर परिचय मेळाव्याच्या माध्यमातून आतापर्यंत १५५० रेशीमगाठी जुळवून त्यांचे विवाह संपन्न झाले आहेत. तसेच प्रतिष्ठान मार्फत गेल्या १७ वर्षामध्ये विविध क्षेत्रातील जवळपास २ हजार गुणवंतांचा आतापर्यंत सत्कार केलेला आहे. तरी वरील कार्यक्रमास समाज बांधव, शिक्षक, गुणवंत विद्यार्थी यांनी मोठया संख्येने उपस्थित रहाण्याचे आवाहन संयोजन समितीच्यावतीने डॉ.संजय तांदळे, प्रा.ज्ञानेश्वर वाघ, रामदास हांगे, इंजि.उत्तमराव मिसाळ, प्रा.डी.जी.तांदळे, बाबा जायभाये, बाजीराव ढाकणे, पांडुरंग जायभाये, प्रा.बाळासाहेब नागरगोजे, लक्ष्मण चाटे, प्रा.बिभीषण चाटे, राजेंद्र तिडके, मोहनराव सिरसाट, गणेश सानप, रवींद्र मुंडे, प्रा.अशोक नागरगोजे, श्रीराम ढाकणे, संतोष गर्जे, आत्माराम वाव्हळ, डॉ.लक्ष्मण पवळ, बाळासाहेब खाडे, उध्दव लाड आदींनी केले आहे.

## पान १ वरून...

### २०१९ नंतर जमीन खरेदी केलेल्या

केली जात असल्याचे मंत्री भरणे यांनी स्पष्ट केले. निकषांमध्ये बदल झाल्यास राज्यातील मोठ्या संख्येने नवीन जमीनधारक शेतकरी पीएम किसान आणि नमो किसान योजनांच्या आर्थिक सहाय्याच्या कक्षेत येतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

------------

### कॅबिनेटमध्ये शिक्कामोर्तब; जि.प

पंचायत समितीत सदस्य संख्येमागे २० टक्के सदस्य निवडता येणार असल्याची माहिती आहे. किमान ५ सदस्य निवडणे बंधनकारक असणार आहे. यासंदर्भात लवकरच विधिमंडळात कायदा पारीत केला जाणार असल्याची माहिती आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्वीकृत सदस्यसंदर्भात मुख्यमंत्र्यांकडे मागणी केली होती. ग्रामीण राजकारणाच्या दृष्टीने सरकारचा हा महत्त्वाचा निर्णय आहे.जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांतर्गत जिल्हा परिषदेत ५ आणि पंचायत समितीमध्ये २ सदस्यांची स्वीकृत सदस्य म्हणून नेमणूक करण्यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमात सुधारणा करण्यात यावी, अशी मागणी यापूर्वीच महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पत्राद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. मुख्यमंत्र्यांनी या विषयावर सकारात्मक प्रतिसाद देत ग्रामविकास विभागाला कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार, आता राज्य मंत्रिमंडळाच्या कॅबिनेट बैठकीत या निर्णयावर शिक्कामोर्तब झाल्याची माहिती आहे.

-------

### अखेर सुनेत्रा पवार राष्ट्रवादीच्या

अजित दादा २८ जानेवारी दिवशी आपल्यातून निघून गेले, आपल्या सर्वांसाठी ते धक्कादायक होतं. आपल्या सर्वांना प्रश्न होता उद्या आपण काय करणार, कसं करणार? पण सुनेत्राताईंच्या नेतृत्वात आपला पक्ष काम करेल, असे प्रफुल पटेल यांनी म्हटले. दरम्यान, राष्ट्रवादीच्या बैठकीसाठी सुनेत्रा पवार, सुनील तटकरे, प्रफुल पटेल, पार्थ पवार, रुपाली चाकणकर छगन भुजबळ यांच्यासह अनेक नेते व पदाधिकारी उपस्थित होते. मागच्या महिन्यात आपण पाहिलं की, काहींजण बोलू लागले. आपल्या पक्षात काही संबंध नाही ते काहीही बोलायला लागले, आम्ही काय करायचं ते सांगायला लागले. पोटात एक आणि ओठात एक बोलू लागले. परंतु आपण सुनेत्रा पवारांना उपमुख्यमंत्री केलं. आपण योग्यवेळी योग्य निर्णय केला. आता, आपल्याला अजित पवारांच्या आदर्शावर पुढे जायचं आहे. आता आपण नव्या अध्यक्षांच्या नेतृत्वात आपली वाटचाल करणार आहोत. आपण सर्वजण याठिकाणी एकत्र आलो आहोत. सगळ्या प्रांतातील लोकं याठिकाणी आले आहेत, असे म्हणत प्रफुल पटेल यांनी सुनेत्रा पवारांच्या नावाची घोषणा केली. अजित पवारांनी मला राष्ट्रीय कार्याध्यक्ष केलं होतं. त्यांनी माझ्यावर एवढा मोठा विश्वास टाकला होता. पक्ष महाराष्ट्र आणि देशाच्या हितासाठी आम्ही काम केलं. राष्ट्रीय कार्याध्यक्ष म्हणून माझी आणि प्रदेश अध्यक्ष म्हणून तटकरे आणि भुजबळ, मुश्रीफ आमची सर्वांची जबाबदारी होती आपला पक्ष आपण कशा प्रकारे पुढे घेऊन जाणार आहोत. मी ३५ वर्ष अजित पवारांचा मित्र म्हणून आज घोषणा करत आहे सुनेत्रा पवार यांना राष्ट्रीय अध्यक्ष केल जावं, असा प्रस्ताव प्रफुल पटेल यांनी मांडला. त्यानंतर, सर्वांनी हात उंचावत सहमती दर्शवली.या बैठकीस सुनील तटकरे छगन भुजबळ हसन मुश्रीफ ,धनंजय मुंडे अनिल पाटील जय पवार पार्थ पवार ,बनसोडे , रुपाली चाकणकर नवाब मलिक यांच्यासह राष्ट्रवादी राज्य आणि राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य आणि राष्टवादीचे आमदार उपस्थित होते.

-------------

### २० मार्चपूर्वी अध्यक्ष व

सिंधुदुर्ग, पुणे, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, धाराशीव, लातूर आणि परभणी या १२ जिल्ह्यापरिषदांची निवडणूक झाली आहे. यातील अनेक जिल्हा परिषदांमध्ये कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत मिळालेले नाही. त्यामुळे महाविकास आघाडी व महायुतीमध्ये सत्तेसाठी वेगवेगळी समीकरणं तयार झाली आहेत. सत्ताधारी महायुतीतील तीन पक्षही अनेक ठिकाणी एकमेकांविरोधात उभे आहेत. त्यामुळे कुठे कोणाचे समीकरण जुळणार व कोण बाजी मारणार याची उत्सुकता आहे.

------------

### विमान दुर्घटना : घातपात आढळल्यास

वरील सर्व बाबींच्या अनुषंगाने या प्रकरणाचा तपास सुरू आहे. या अपघाताच्या पहिल्या क्षणापासून आतापर्यंत तपास अतिशय प्रोफेशनल पद्धतीने आणि योग्य दिशेने सुरू आहे. बारामतीतील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील फॉरेन्सिक विभाग, पुण्यातील फॉरेन्सिक सायन्स लॅब, एव्हिएशन ऑथॉरिटी, इतर संबंधित एजन्सी तसेच केंद्रातील अनेक संस्था या तपासात सहकार्य करत आहेत.एएआयबी यांच्याशी सीआयडीचा सातत्याने संपर्क असून त्यांचाही तपास सुरू आहे. थोडक्यात, या तपासामध्ये घातपात, गुन्हेगारी निष्काळजीपणा किंवा अन्य गुन्हेगारी कृत्य निष्पन्न झाल्यास योग्य त्या कलमांखाली सीआयडी गुन्हा दाखल करून पुढील तपास पूर्ण करेल आणि न्यायालयात अभियोग चालवेल,'' असे सीआयडी अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

--------------

### गोळा केलेले पुरावे

अधिकार आहे. आम्हाला सांगण्यात आले की, अजितदादांचा अपघात झाला आणि त्यात त्यांचा मृत्यू झाला, त्यामुळे 'अकस्मात मृत्यू'ची नोंद करून पुढील तपास सुरू आहे. मात्र, आमचे म्हणणे असे आहे की, डीजीसीएने कंपनीला जबाबदार धरले असतानाही आजपर्यंत एकही एफआयआर का दाखल झाला नाही?''आम्हाला सांगण्यात आले की, तपास सीआयडी करत आहे, त्यामुळे पोलीस एफआयआर घेऊ शकत नाहीत. परंतु असा कोणताही नियम नाही. अकस्मात मृत्यूच्या नोंदीनंतरही एफआयआर करता येतो, असा सर्वोच्च न्यायालयाचा निकाल आहे. आम्ही दोन महत्त्वाच्या निकालांचा अभ्यास करून एफआयआर करण्याचा प्रयत्न केला, पण यश आले नाही. पोलीस सहकार्य करत नसल्यामुळेच आम्ही आज सीआयडीच्या प्रमुखांची भेट घेण्याचे ठरवले,'' असेही त्यांनी स्पष्ट केले.

----------

### मुख्यमंत्र्यांनी दोन तासाच्या भाषणात हिंदीसक्ती

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण अभियान हे ११ महिन्यांसाठी असणार ते आधीच घोषित केले होते, इतरत्र नोकरीला जाताना उमेदवारांना फायदा व्हावा यासाठी त्यांना अनुभवपत्र देण्यात आले होते. प्रशिक्षणार्थी युवकांना पर्मनंट करणार हे सांगितल्याचे भास्कर जाधव म्हणाले, तसं रेकॉर्ड आमच्याकडे आहे असंही ते बोलले. मात्र, तसे रेकॉर्ड असेल तर पाठवून द्या . युवा प्रशिक्षण युवकांना पर्मनंट करतो हे सांगणाऱ्या मंत्र्याचा अहवालच राज्यपालांकडे पाठवतो, असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भास्कर जाधवांचे मत खोडून काढले. चांगल्याला चांगलं म्हणायला शिका. विरोधी पक्षाने चहापानपासून राजकारण करायला सुरुवात केली. हम नही सुधरेंगे असं ते आहे. ते म्हणाले, यांची काळी चहा-कॉफी पिणार नाही. आम्ही त्यांचे काळे धंदे बाहेर काढ, ज्यांनी काळे धंदे केले त्यांना लोकांनी घरी बसवले आणि आम्ही तुम्हाला काळा चहा पाजला नसता. आम्ही गोकुळ दुधाचा चहा पाजला असता, असा टोला मुख्यमंत्र्यांनी लगावला. महाराष्ट्रात मराठीच अनिवार्य आहे. मराठी शाळा बंद पडल्या नाहीत, ८४ टक्के शाळा मराठी माध्यमांच्या आहेत, ६९ टक्के विद्यार्थी मराठी शिकत आहेत. मराठी शाळा बंद पडल्याची माहिती कपोलकल्पित आहे, असेही फडणवीसांनी सांगितले. कुंभमेळ्यामुळे यूपीचे ब्रँडिंग हे जगात झाले, आपल्याला ही कुंभमेळ्यातून जगात महाराष्ट्राचे ब्रँडिंग करायचे आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे, ती जोपासायची आहे, असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले. नवीन शैक्षणिक धोरणासाठी २१ सप्टेंबर २०२० साली मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी समिती नेमली, त्यात वेगवेगळे कुलगुरू होते, शिक्षणतज्ज्ञ होते. विजय कदम हे महत्वाचे नाव आहे, ते ठाकरे सेनेचे नेते पण आहेत. या कमिटीत १६ लोक मराठी होते. या समितीने उद्धव साहेबांकडे अहवाल दिला. त्यावर उद्धवजींनी अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले. १५ सप्टेंबर २०२१ रोजी यावर बातम्या झाल्या. बदलत्या काळात या शिफारसीनुसार, महाराष्ट्राला शैक्षणिकदृष्ट्या प्रगतीपथावर ठेवण्यासाठी या शिफारसी गरजेच्या आहेत, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. या शिफारसमध्ये इंग्रजी व हिंदी भाषा ही दुसरी भाषा म्हणून पहिल्या वर्षापासून लागू करावी असे म्हटलंय. पहिली ते बारावी इंग्रजी शिकतील, उच्च शिक्षण संस्थांमध्ये मराठीला प्राधान्य द्यावेच लागेल. पण इंग्रजी व हिंदी पहिली ते बारावीपर्यंत सक्तीची करावी, अशी माहितीही फडणवीसांनी दिली. मी जयंत पाटील यांना विचारतो, अहवाल मंत्रिमंडळ स्विकारतो ना? १४ सप्टेंबर २०२१ रोजी अहवाल सादर झाला. २० सप्टेंबर रोजी तो मंत्रिमंडळात ठेवला. मी त्याचे इतिवृत्त घेऊन आलो आहे. डॉ. माशेलकर समितीचा अहवाल मुख्यमंत्र्यांनी वाचून दाखवला. तसेच, यावर सही कुणाची? आदित्य जी सांगतील ना? मंत्री कोणीही असू द्या असे म्हणत मुख्यमंत्र्यांनी विरोधकांना कोंडीत पकडले. तसेच, मुख्यमंत्री असताना मंत्र्यांचे काहीही अस्तित्व नसते, असेही त्यांनी म्हटले. सरकारी पदांच्या नियुक्तीबाबत सांगताना आनंद होतो, महायुती सरकार आल्यापासून १ लाख २० हजार ४४९ लोकांना नियुक्ती दिली आहे. अजून काही नियुक्तीपत्र शिल्लक आहेत, हा आकडा दीड लाख पर्यंत जाईल. आम्ही ७५ हजार सांगितले होते, आता नव्याने भरतीचे सत्र सुरु करत आहोत.महाराष्ट्रात सर्वाधिक एसीबी छापे पडत आहेत, हे छापे सुरूच राहणार आहेत. एसीबी मंत्र्यांच्या कार्यालयात देखील छापा टाकू शकते, माझ्या कार्यालयात सुद्धा कुणी पैसे मागितले तर छापा टाकून कारवाई होणारच, असे म्हणत एसीबीने मंत्री झिरवळ यांच्या कार्यालयात टाकलेल्या छाप्यासंदर्भात मुख्यमंत्री फडणवीस यांनी भूमिका मांडली. एसीबीला छाप टाकण्यासाठी कुणाच्या परवानगीची गरज नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

-------------

### अधिकृत आधार केंद्र आता गुगल मॅपवर

अपॉइंटमेंट बुकिंग करता येईल.गुगल आणि यूआयडीएआय यांच्याकडून भागीदारी केल्यानंतर अधिकृत आधार केंद्र गुगल मॅपवर दिसतील. यामुळं देशभातील नागरिकांना अधिकृत आधार केंद्रांची माहिती सहजपणे मिळेल.आधार केंद्रांकडून ज्या प्रकारच्या सेवा दिल्या जातात, त्यानुसार आधार केंद्रांची माहिती गुगल मॅपवर दिसेल. लहान मुलांची नोंदणी, प्रौढ नागरिकांची नोंदणी, फक्त पत्ता अपडेट करणं, मोबाईल क्रमांक अपडेट करणं यानुसार माहिती गुगल मॅपवर दिसेल. दिव्यांगांच्या सोयींची उपलब्धता, इन्फ्रास्ट्रक्चर, पार्किंग सुविधा, कामाचे तास याबाबतची माहिती गॅगल मॅपवर उपलब्ध असेल. याबाबतच्या सुविधा येत्या काही दिवसात गुगल मॅपवर दिसतील.देशभरामधील ६० हजार आधार सेवा केंद्र गुगल मॅपवर असतील. गुगल मॅपवर जी आधार केंद्र दिसतील, ती अधिकृत केंद्रं असतील. गुगल मॅपवर अधिकृत आधार सेवा केंद्र आल्यानंतर नागरिकांना सुलभ, जलदगतीनं आणि पारदर्शक सेवा मिळतील असं यूआयडीआयचे सीईओ म्हणाले. गुगलसोबतच्या भागिदारीनंतर यूआयडीएआय आधार सेवा केंद्राची माहिती व्यवस्थापित करण्यासाठी आणि लोकांच्या कमेंटना थेट प्रतिसाद देण्यासाठी गुगल बिझनेस प्रोफाइलचा वापर करेल.

-------------

### एसटीच्या उत्पन्नात दररोज

सुमारे १२६०० वर आली. परिणामी, अनेक मार्गांवर फे-या अपु-या पडत असल्याची ओरड होत आहे.एसटी महामंडळाच्या दीर्घकालीन धोरणानुसार पुढील काही वर्षांत २० ते २५ हजार बसेस खरेदी करण्याचा महामंडळाचा मानस आहे. त्याला राज्य शासनाची तत्त्वत: मान्यता मिळाली असल्याची माहिती सूत्रांनी दिली. यानुसार यंदा पहिल्या टप्प्यात ८,३०० बसेस खरेदी केल्या जाणार आहेत. तीन बाय दोन आसन रचनेच्या ५५ आसनी तीन हजार बसेस मार्चपासून टप्प्याटप्प्याने महामंडळाच्या ताफ्यात दाखल होणार असल्याचा दावा करण्यात आला आहे.दररोज ७० ते ७५ लाख प्रवाशांच्या वाहतुकीचे लक्ष्य गाठण्याचे महामंडळाचे नियोजन आहे.सध्या एसटीचा दैनंदिन खर्च ३५ कोटी रुपये असून उत्पन्न ३३ कोटी रुपयांच्या घरात आहे. एसटी हा केवळ नफा कमावणारा उद्योग नसून ती राज्याची जीवनवाहिनी आहे, मात्र किमान तोटा टाळण्यासाठी खर्च आणि उत्पन्नाचा समतोल साधला जाईल, असे मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले. ग्रामीण भागातील मुक्कामी फे-या आणि आदिवासी पाड्यांपर्यंतची सेवा पुन्हा पूर्ववत करून लालपरीला आर्थिक गर्तेतून बाहेर काढण्यासाठी प्रशासन आता सज्ज झाले आहे.

-------------

### न्यायालयातील भ्रष्टाचारासंबंधीचा

वादानंतर आणि थेट सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी तीव्र आक्षेप घेतल्यानंतर अखेर या पाठ्यपुस्तकात सुधारणा करण्यात येणार असल्याचे वृत्तात म्हटले आहे.सूत्रांच्या मते या पाठ्यठ्यपुस्तकाची चर्चा प्रामुख्याने प्रलंबित न्यायालयीन खटले आणि न्यायव्यवस्थेतील कथित भ्रष्टाचार यासारख्या मुद्द्यांवर केंद्रित होती. मात्र, काही निवडक उदाहणांमुळे न्यायव्यवस्थेच्या कार्यप्रणाली आणि विश्वासार्हतेबद्दल अनपेक्षित किंवा दिशाभूल करणारा संदेश जाऊ शकतो. त्यामुळे आता या पाठ्यपुस्तकात सुधारणा करण्यात येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.ज्येष्ठ वकील ए. एम. सिंघवी आणि कपिल सिब्बल यांनी हा मुद्दा उपस्थित केल्यानंतर सरन्यायाधीशांनी ही प्रतिक्रिया दिली. मी कोणालाही संस्थेची बदनामी करू देणार नाही. याचा समाना कसा करायचा हे मला ठाऊक आहे असे सरन्यायाधीश म्हणाले.

----------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार दि. २७ फेब्रुवारी २०२६



## थोडक्यात



### महाराणी ताराबाई वडवणी शाळेचे एनएमएमएस परीक्षेत ३८ विद्यार्थी उत्तीर्ण

**वडवणी । प्रतिनिधी**

इयत्ता आठवीतील राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकातील (एनएमएमएस) विद्यार्थ्यांसाठी २८ डिसेंबर २०२५ रोजी घेतलेल्या परीक्षेचा निकाल नुकताच अधिकृत संकेतस्थळावर दि.२४ फेब्रुवारी २०२६ मंगळवारी रोजी जाहीर करण्यात आला यामध्ये महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वडवणी येथील शाळेचा चि.साई ज्योतिराम टिपरे याने या परीक्षेत १५७ विक्रमी गुण घेऊन वडवणी तालुक्यात प्रथम येत नवा रेकॉर्ड निर्माण केला आहे या शाळेचे तब्बल ३८ विद्यार्थी एनएमएमएस परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत.

या शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती शोभा के.आंधळे / डोईफोडे यांनी एनएमएमएस परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांनासाठी एक्स्ट्रा तासिकेचे शाळेत नियोजन केले होते विभाग प्रमुख चव्हाण सर,श्री.विष्णू मंत्रे सर तसेच विषय शिक्षक यांच्या सहकार्यामुळे तब्बल ३८ विद्यार्थी या परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत.

या यशाबद्दल शाळेचे संस्थापक माजी आमदार केशवराव आंधळे,शालेय समिती अध्यक्ष संजय आंधळे,संस्थेचे अध्यक्ष अनिलदादा चोले,मार्केट कमिटी संचालक रणजीत धस, संस्थेचे संचालक इंजि.अशोक आंधळे तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका शोभा के.आंधळे,उपमुख्याध्यापक मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर,श्री.डोईफोडे सर,श्री कुलकर्णी सर यांनी मार्गदर्शक शिक्षक व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे तसेच शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### नागनाथ विद्यालयाचे एनएमएमएस परीक्षेत यश

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील मोरगाव येथील नागनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी एनएमएमएस परीक्षेत यश मिळविले आहे. सन २०२५-२६ हे या शैक्षणिक वर्षात एनएमएमएस परीक्षेत नागनाथ विद्यालय, मोरगाव ता.जि.बीड चे पंधरा विद्यार्थी प्रविष्ट झाले होते, त्यापैकी खालील सात विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले. चि.शिवम पाठक, पृथ्वीराज थोरात, संकेत सांगळे, रणजीत कागदे, कु.संस्कृती वामने, अमृता कागदे, अनुष्का धवन या विद्यार्थ्यांना चंद्रकात चाळक, सखाराम कुडके या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव, माजी मंत्री जयदत्त (अण्णा) क्षीरसागर,युवा नेते रोहित क्षीरसागर, प्रशासन अधिकारी डॉ.राजा मचाले, सहाय्यक प्रशासन अधिकारी योगेश पवार, कार्यवाहक राऊत एम.ए., अधीक्षक प्रकाश राठोड, नागनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य माटे डी.बी., पर्यवेक्षक वाणी बी. एस., यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# शुक्लतीर्थ व वांगी देवस्थानसाठी पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर

दिंद्रुड । प्रतिनिधी

आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओम प्रकाश शेटे यांनी २०२३ पासून केलेल्या प्रामाणिक पाठपुराव्याला यश आले. आज मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या निर्देशानुसार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजनेअंतर्गत संत नारायण बाबा देवस्थान वांगी व श्री क्षेत्र शुक्लेश्वर देवस्थान मौजे शुक्लतीर्थ लिमगाव ता.माजलगाव येथील दोन्ही देवस्थानासाठी जवळपास तब्बल पाच कोटी रुपयांच्या आसपास निधी मंजूर करून प्रशासकीय मान्यता देण्यात आली. याबद्दल डॉ. शेटे यांनी मुख्यमंत्री, ग्रामविकास मंत्री व सरकारचे आभार मानले आहेत.

माजलगाव तालुक्यातील श्रीक्षेत्र शुक्लतीर्थ लिमगाव हे ऐतिहासिक व पुण्यपावन धाम म्हणून प्रसिद्ध आहे. हे देवस्थान तीर्थक्षेत्र ब मध्ये येण्यासाठी डॉ. शेटे यांचे मोलाचे योगदान आहे. येथे दरवर्षी लाखो भाविक दर्शनासाठी येत असतात. तसेच दशक्रिया विधी करण्यासाठी येणाऱ्या कुटुंबांची संख्याही मोठी आहे. मात्र सोयी सुविधांचा अभाव असल्याने या ठिकाणी मोठ्या प्रमाणात विकास कामे अपेक्षित होती. त्यासाठी डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा केला होता, आज या पाठपुराव्याला यश आले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना (ब वर्ग) अंतर्गत २ कोटी ७८ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यामध्ये प्रसादालय, सभामंडप, भक्त निवास , महिला व पुरुषांसाठी शौचालय आदी विकास कामे केली जाणार आहेत.



**अखेर डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या पाठपुराव्याला यश**

वैकुंठवासी संत नारायण बाबा देवस्थान वांगी या तीर्थक्षेत्रालाही डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या प्रयत्नाने तीर्थक्षेत्र ब चा दर्जा मिळाला होता. पंचक्रोशीतील जवळपास ६० गावांमध्ये या देवस्थानचा भक्त व शिष्य परिवार आहे. जागृत देवस्थान असलेल्या या देवस्थानला वर्षभरात लाखोंच्या संख्येने भाविक भक्त दर्शनासाठी येतात. या ठिकाणी हे मोठ्या प्रमाणात विकास कामे अपेक्षित आहे. त्यासाठी येथे मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता होती. डॉ. शेटे यांनी मुख्यमंत्री महोदयांकडे पाठपुरावा करून २ कोटी ०३ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करून आणला आहे. यामध्ये सांस्कृतिक सभागृह, भोजन कक्ष, महिला व पुरुषांसाठी शौचालय, संरक्षक भिंत, पेवर ब्लॉक आदी विकास कामे केली जाणार आहेत.


माजलगाव विधानसभा मतदारसंघातील दोन्ही देवस्थानच्या विकासाकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे व सरकारने दिलेली ही मदत अनमोल आहे. खऱ्या अर्थाने, अशी देवस्थाने दरवर्षी अखंड हरिनाम सप्ताहाद्वारे जिल्ह्यातील सामाजिक स्वास्थ्य अबाधित राखण्यासोबतच जातीयतेची दरी कमी करण्यात मदत करतात. या धार्मिक संस्थानांचा विकास करणे सर्वांची जबाबदारी आहे.- डॉ. ओमप्रकाश शेटे

## संत भगवान बाबांनी अध्यात्माबरोबरच समाज सुधारण्याचे महान कार्य केले-ह.भ.प.सविताताई केकान महाराज

बीड । प्रतिनिधी

संत भगवानबाबांनी अध्यात्म बरोबरच समाज सुधारण्याचे महान कार्य केले. भगवान बाबा यांनी समाजातील अनिष्ट रूढी परंपरा बंद करून समाजाला सन्मार्गाला लावण्यासाठीचे त्यांचे कार्य सर्वश्रेष्ठ आहे, असे प्रतिपादन झी टॉकीज फेम ह.भ.प. सविताताई केकान (मुंडे) महाराज यांनी केले.

बीड येथे संत भगवान बाबा प्रतिष्ठान' वर आयोजित अखंड हरीनाम सप्ताहात सविताताई महाराज बोलत होत्या. 'सुखे खावे अन्न, त्याचे करावे चिंतन, त्याचे दिले त्यासी, पावे फळ आपणासी'



या संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या अभंगावर त्यांनी निरुपण करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. संत भगवानबाबा यांनी वारकरी संप्रदायाच्या प्रसार आणि प्रचाराचे महान कार्य केले. अनिष्ट रूढी बंद करून समाजाला सन्मार्गाला लावण्याचे काम केले. अनिष्ट रूढी प्रथा परंपरा बंद करून सन्मार्ग दाखविला. शिक्षणाचे महत्त्व समजून सांगितले त्यामुळे निरक्षर असणारे लाखोंनी शिक्षण घेतले. बहुजन समाजातील वंचित समाजाच्या उद्धाराचे कार्य त्यांनी केले. भगवान बाबा यांनी दाखवून दिलेल्या मार्ग मार्गाने वाटचाल केल्यास जीवन उद्धरून जाईल.जीवनाचे कल्याण होईल असे प्रतिपादन त्यांनी केले. यावेळी ह.भ.प. केकान महाराज यांनी भगवानबाबा यांच्या जीवनातील विविध प्रसंग सांगितले. यावेळी मृदंगाचार्य ज्ञानेश्वर माऊली तांदळे, गायनाचार्य ह.भ.प. बंडू महाराज जटाळ, अंगद महाराज सोनवणे, प्राचार्य त्रंबक महाराज मातकर, नामदेव मुंडे, किसन महाराज माने, मनोज बोठे, श्रीराम महाराज सानप, शेळके महाराज, आश्रुबा सानप, विणेकरी बेबीताई दुधाळ, वाल्मिक म. चाटे, यांनी साथसंगत केली. कार्यक्रमास ह.भ.प. खरमाटे महाराज डॉ. विक्रम सारुक, प्राचार्य वसंत सानप, प्रा. आर. टी. गर्जे, विलास कुटे, बबनराव सानप, सुधाकर सानप, रामहरी घुले, महादेव घोळवे, नारायण नागरे, आदींसह भाविकांची मोठी उपस्थिती होती.

## सुंदरराव सोळंके महाविद्यालयात राज्यस्तरीय सामान्यज्ञान स्पर्धेचे पारितोषिक वितरण

माजलगाव प्रतिनिधी

छ. शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त निमित्ताने सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील इतिहास विभाग व सुंदर रत्न करिअर अकॅडमीच्या संयुक्त विद्यमाने शिवचरित्रावर आधारित



राज्यस्तरीय सामान्यज्ञान स्पर्धा परीक्षा घेण्यात आली. विजेत्या स्पर्धकांना पारितोषिक वितरीत करण्यात आले.

सुंदरराव सोळंके महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने मागील सात वर्षापासून राष्ट्रीय व राज्यस्तरीय सामान्यज्ञान स्पर्धा आयोजित करण्यात येते. यावर्षी स्पर्धेसाठी विविध महाविद्यालयातील स्पर्धकांनी सहभाग नोंदवला.स्पर्धेचे उद्घाटन पोलिस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांच्या हस्ते करण्यात आले.

स्पर्धेचे पारितोषिक वितरण कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.जी. के. सानप होते तर प्रा. नीलकंठ साबळे यांची प्रमुख उपस्थिती होती .यावेळी उपप्राचार्य डॉ.एन. के. मुळे, उपप्राचार्य डॉ.एम.ए. कव्हळे,उपप्राचार्य प्रकाश गवते, उपप्राचार्य पवन शिंदे, इतिहास विभागप्रमुख डॉ.बालाजी बोडके, डॉ. सुदर्शन स्वामी, धारूर येथील प्रा.नागोराव वाघमारे, प्रा.कापावार यांची प्रमुख उपस्थिती होती. राज्यस्तरीय स्तरावर घेण्यात आलेल्या सामान्य ज्ञान स्पर्धेत

बादाडे गीता अशोक (प्रथम ), साळवे अंजली बालासाहेब (द्वितीय ) टाकणखार साधना कैलास (तृतीय) तर उत्तेजनार्थ पारितोषिक लोकरे पूजा विजय, कांदे अश्विनी श्रीराम, राऊत पायल सचिन यांनी पारितोषिक पटकावले. विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम,स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. बालाजी बोडके यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.सुदर्शन स्वामी यांनी केले तर प्रा.संजय बागुल यांनी आभार मानले. यावेळी विद्यार्थी -विद्यार्थिनी,स्पर्धक, प्राध्यापक उपस्थित होते.

## गणिताच्या दुनियेत 'वेदांश'चा डंका! राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धेत पटकावले सुवर्ण पदक

**बीड । प्रतिनिधी**

**गणिताची आकडेमोड म्हणजे अनेकांसाठी डोकेदुखी असते, पण याच आकड्यांशी मैत्री करत वेदांश युवराज चव्हाण याने आपल्या बुद्धिमत्तेची चुणूक दाखवली आहे. 'जीनिअस अबॅकस अकॅडमी' तर्फे आयोजित राज्यस्तरीय ऑनलाईन अबॅकस चॅम्पियनशिप मध्ये वेदांशने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम श्रेणीसह (- Grade) यश संपादन केले असून, त्याच्या या घवघवीत यशाबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.**



आजच्या धावपळीच्या युगात तंत्रज्ञानासोबतच बुद्धीचा कस लागणाऱ्या स्पर्धांचे महत्त्व वाढले आहे. या स्पर्धेत राज्यभरातून अनेक विद्यार्थी सहभागी झाले होते. मात्र, वेदांशने आपल्या एकाग्रतेच्या आणि अचूकतेच्या जोरावर लेव्हल-१ मध्ये बाजी मारली. अत्यंत कमी वेळात कठीण आकडेमोड करून त्याने परीक्षकांची मने जिंकली. वेदांशने हे यश मिळवण्यासाठी सातत्यपूर्ण सराव आणि मेहनतीची जोड दिली. त्याच्या या यशात त्याच्या मार्गदर्शकांसह पालकांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. एका हातात मानाची ट्रॉफी आणि दुसऱ्या हातात प्रशस्तीपत्रक घेतलेल्या वेदांशचा आत्मविश्वास त्याच्या यशाची मोठी साक्ष देत आहे. वेदांशच्या या 'दणकेबाज' कामगिरीमुळे चव्हाण परिवाराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. त्याच्या या यशाबद्दल मित्रपरिवार, नातेवाईक आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांकडून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आगामी काळात देखील तो अशाच प्रकारे गणिताच्या क्षेत्रात मोठी मजल मारेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

मुलांमधील सुप्त गुणांना वाव दिला तर ती नक्कीच आकाशाला गवसणी घालू शकतात, हे वेदांशने सिद्ध केले आहे. त्याचे हे यश भविष्यातील मोठ्या वाटचालीची नांदी आहे.

- विश्वास टेकाळे, अबॅकस शिक्षक



## देव,देश, धर्मासाठी आयुष्य समर्पित करणारे स्वातंत्र्यवीर सावरकर - रूपाली कचरे

माजलगाव । प्रतिनिधी

येथील भारतीय जनता पार्टी माजलगावच्या वतीने स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुण्यतिथी निमित्त पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. भारतीय जनता पार्टीच्या कीट्टी आडगाव मंडळाध्यक्ष रूपाली कचरे यांच्या निवासस्थानी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. याप्रसंगी रूपाली कचरे यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या आठवणीला उजाळा देताना म्हटले की देव देश धर्मासाठी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी आपले संपूर्ण जीवन आत्म समर्पित केले.. आपल्या परिवाराचा देखील विचार न करता देशासाठी धर्मासाठी त्यांनी समर्पण भावनेने संपूर्ण जीवन समर्पित केले.. सावरकर हे प्रकार राष्ट्रभक्त ,भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील धगधगते अग्निकुंड, थोर क्रांतीकारक स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर होते . त्यांनी केलेला संघर्ष व देशासाठी समर्पित केलेले आयुष्य हे कोणीही विसरणार नाही. याप्रसंगी माजलगाव शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी, सरचिटणीस कैलास खुरपे,पवन मोगरेकर,रमेश शेंडगे,सिद्धेश्वर राठोड,शहर उपाध्यक्ष बाळासाहेब क्षीरसागर,भाजपा नेते ईश्वर खुरपे, शहर चिटणीस, विनोद लड्डा,मनोज कोरडे.युवा नेते संतोष सोळंके,रवी वाकळे सह भाजपा पदाधिकारी उपस्थित होते.

पान ६ वरुन...

### बीड जिल्ह्यात छत्रपती

जनता दरबार सुविधा शिबिरांमध्ये उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. महसूल कायद्यातील कलम ४२ अन्वये अकृषिक रूपांतरण प्रक्रियेतील सुधारणा व एकवेळ अधिमूल्याच्या नव्या दरांबाबतही नागरिकांना मार्गदर्शन केले जाणार आहे.

सदर अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व सर्व संबंधित विभागांना आवश्यक निर्देश देण्यात आले असून प्रत्येक शिबिरानंतर विहित नमुन्यात अहवाल सादर करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी या शिबिरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

### पायी नर्मदा परिक्रमा

रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत बाळूमामा मंदिर ते हनुमान मंदिर टाकळी आमीया या मार्गावर भजन मिरवणूक काढण्यात येणार आहे. सायंकाळी ४ ते ६.३० या वेळेत हरिपाठ तर सायंकाळी ७: ०० ते ८:३० वेळेत दादा महाराज चांगुने यांचे हरी किर्तन होणार असून त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. यावेळी आष्टी तालुका गौरव समाज संघाच्यावतीने गजानन शिर्के यांचा भव्य सत्कार करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील गुरव समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आष्टी तालुका गुरव समाज संघाचे अध्यक्ष भीमराव गुरव, उपाध्यक्ष बापूराव क्षीरसागर आणि सचिव राम शिर्के यांनी केले आहे.

### आष्टी तालुक्यातील घरकुल

संबंधित तलाठी यांचे मार्फतीने गावातील घरकुल लाभार्थ्यांना प्रत्येकी पाच ब्रास वाळू वाटप करण्यात येणार असून घरकुल बांधकामासाठी लाभार्थ्यांना वाळू वाटपाचा शुभारंभ करण्यात आलेला आहे.. लवकरच सर्व ठिकाणी सर्व लाभार्थ्यांना वाळू पोच होणार आहे असे असे सांगत लाभार्थ्यांनी याविषयी आणखी काही माहिती हवी असल्यास आपल्या सज्जाचे तलाठी अथवा तहसील कार्यालयाकडे संपर्क करावा अशी माहिती यावेळी नायब तहसीलदार पांडुरंग माढेकर यांनी दिली.

### एसटी सवलत कार्डासाठी जादा

विभागीय स्तरावर कोणती परवानगी आहे का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.या प्रकरणी एसटी महामंडळाच्या संबंधित विभाग नियंत्रकांनी तात्काळ अधिकृत खुलासा करावा व सवलत कार्डासाठी केवळ १९९ रुपयेच आकारण्याच्या स्पष्ट सूचना द्याव्यात, अशी मागणी होत आहे. अन्यथा जादा वसुलीबाबत गंभीर कारवाईची मागणी पुढे येण्याची शक्यता आहे.

## स्वातंत्र्य सैनिक रेल्वे मागणी आंदोलन समितीचे शिष्टमंडळ खासदार, जिल्हाधिकारी यांना भेटणार

**बीड जिल्ह्यातून जाणाऱ्या दोन नियोजीत लोहमार्गाच्या कामाच्या अडथळे निवारणासाठी देणार निवेदन**

बीड । प्रतिनिधी

अहिल्यानगर- बीड - परळी वैद्यनाथ या मार्गातील कामांमध्ये जे काही अडथळे आहेत त्या अडथळ्याची माहिती घेऊन त्याच्या संदर्भात नियोजन करण्यात याचा विचार प्रशासन पातळीवर करावा. संभाजीनगर - बीड- धाराशिव तसेच अहमदनगर बीड परळी या दोन मार्ग सोबत सविस्तर चर्चा होऊन दोन निवेदन तयार करून तिन्ही जिल्ह्याचे खासदार तसेच बीड जिल्हाधिकारी यांना निवेदन तयार करून स्वातंत्र्य सैनिक रेल्वे मागणी आंदोलन समितीचे शिष्टमंडळ खासदार, जिल्हाधिकारी यांना भेटणार असल्याचे समितीच्या बैठकीत सर्वानुमते ठरविण्यात आले आहे.

स्वातंत्र्य सैनिक रेल्वे मागणी आंदोलन समिती जिल्हा बीड ची बुधवारी ( दि. २५ ) समितीची बैठक ज्येष्ठ सदस्य अरुणराव नारायण डाके यांच्या निवासस्थानी घेण्यात आली. यावेळी अध्यक्ष जवाहरलाल सारडा, सचिव सुनील क्षीरसागर, शांतीलाल पटेल, विष्णुदास बियाणी, रामचंद्र जोशी, अशोक म. शेटे, शिवाजी बन्सी जाधव, सय्यद नवीदुजम्मा, रवी उबाळे, अरुण बाबासाहेब डाके, महम्मद लईक अहेमद, भास्करराव जाधव, तुकाराम साळुंके, विलासराव बडगे, वाय जनार्दन राव, सखाराम मस्के, वैभव स्वामी आदी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये अहिल्यानगर - बीड - परळी वैद्यनाथ या लोहमार्गाच्या विकास कामांवर चर्चा करण्यात आली. तसेच चालू असलेल्या अडीअडचणी संदर्भात विचार विनिमय करण्यात आली. या बैठकीमध्ये सध्या चालू असलेल्या कामांमध्ये जे काही अडथळे निर्माण होत आहेत त्याबद्दल चर्चा करण्यात आली, यासंदर्भात लवकरच माहिती घेऊन जिल्हाधिकारी यांना नियोजन देण्यात येणार असल्याचे ठरले. यासोबत धाराशिव - बीड - छत्रपती संभाजीनगर या नवीन रेल्वे मार्गासाठी कृती समितीने प्रयत्न करणे यासह सविस्तर माहिती घेऊन बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे यांच्या समवेत विस्तारीत बैठकीचे नियोजन केले जाणार आहे. तसेच धाराशिव आणि संभाजीनगर येथील खासदार यांना निवेदन देण्याचे संदर्भात चर्चा करण्यात आली. त्यासंदर्भात एक सर्व व्यापक बैठक घेऊन या मार्गासाठी या मार्गाची मागणी तीव्र स्वरूपात करण्याचा विचारविनिमय ठरवण्यात आले. या बैठकीमध्ये धाराशिव - बीड - छत्रपती संभाजीनगर च्या संदर्भात तसेच अहमदनगर बीड परळी रेल्वे मार्गाच्या कामासंदर्भात माहिती घेऊन जिल्हाधिकारी यांच्यामार्फत रेल्वे मंत्रालयांना निवेदन देण्यासंदर्भात साधक बातम्या चर्चा करण्यात आली.

१९८२ ला स्वातंत्र्यसैनिक मदनलाल सारडा यांनी स्वातंत्र्य रेल्वे स्वातंत्र सैनिक रेल्वे आंदोलन समितीची स्थापना केली त्यामध्ये सचिव म्हणून देश भूषण जैन हे होते आणि त्यात २५ जाधव व इतर स्वातंत्र सैनिक सहभागी झालेले होते. या लोकांनी रेल्वे परळी बीड अहिल्या नगर साठी दिल्लीला जाऊन त्यांनी ममता बॅनर्जी यांची भेट घेतली तसेच त्यांनी रेल्वेच्या बाबतीत दोन वेळेला दिल्लीला भेट दिली. रेल्वे मंत्र्यांचे भेट घेऊन त्यांना निवेदन देऊन काम लवकरात लवकर कसे होईल याची यासाठी प्रयत्न करावेत अशी विनंती केली होत. त्यानंतर बजेटमध्ये रेल्वेमंत्र्यांनी बीड परळी अहिल्यानगर साठी बजेट ची तरतूद केली. यासाठी विलासराव देशमुख यांनी मुख्यमंत्री म्हणून रेल्वे साठी लागणारा अर्धा खर्च महाराष्ट्र शासन करण्यास तयार आहे, असे पत्र केंद्र शासनाला दिले तेथून पुढे खरी गती कामाची सुरू झाली. २०१४ मध्ये माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या योजनेला २८०० कोटी रुपयांची तरतूद एक मस्त मंजूर केली म्हणून कामाला गती आली व आज बीड ते अहिल्यानगर ही रेल्वे दररोज चालू लागली पुढे ऑगस्ट १५ ऑगस्ट पर्यंत बीड मुंबई अशी रेल्वे खात्याची रेल्वे चालू करण्याची नियोजन आहे म्हणजे बीड करांची स्वप्न साकार होईल व स्वातंत्र्यसैनिकांनी जो लढा दिला त्याला खरं श्रेय देता येईल, असे ही समितीचे अध्यक्ष जवाहरलाल सारडा यांनी सांगितले.

### ४४ वर्षांचा समितीचा लढा

१९८२ मध्ये स्वातंत्र्य सैनिक रेल्वे मागणी आंदोलन समिती जिल्हा बीड स्थापना झाली. अहिल्यानगर -बीड- परळी वैद्यनाथ लोहमार्गाच्या मागणीसाठी कॉ. अतहर बाबर यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. दरम्यान तत्कालीन खा. केशर काकू क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली समितीचे शिष्टमंडळ दिल्लीला पंतप्रधान इंदिरा गांधी यांना भेटीस गेले. पुढे समितीने स्वातंत्र्य सैनिक मदनलाल सारडा, स्वातंत्र्य सैनिक बन्सीधर जाधव यांच्या अध्यक्षपदाच्या नेतृत्वाखाली आंदोलन तिव्र झाले. आता समितीचे अध्यक्ष जवाहरलाल सारडा असून अहिल्यानगर -बीड- परळी वैद्यनाथ कामे गतीने होण्यासाठी आणि धाराशिव - बीड - छत्रपती संभाजीनगर या नवीन लोहमार्ग ची मागणी उचलून धरली जाणार आहे. एकूणच बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण दोन्ही लोहमार्ग आवश्यक असल्याचे समितीचे अध्यक्ष जवाहरलाल सारडा यांनी सांगितले.

बीडमधून मुंबई अशी रेल्वे खात्याची रेल्वे चालू होईल

# चिंचाळ्याचे प्रगतशील शेतकरी अशोक पोकळे : सेंद्रिय केळीची इराणपर्यंत झेप

आष्टी

सध्याच्या वेगवान आणि विज्ञाननिष्ठ युगात शेतीत काहीच राहिले नाही, शेती तोट्याचीच आहे, असे मत व्यक्त करणाऱ्यांची संख्या वाढताना दिसते. मात्र जिद्द, प्रयोगशीलता आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास शेती हा अत्यंत फायदेशीर व्यवसाय ठरू शकतो, याचा जिवंत आदर्श आष्टी तालुक्यातील चिंचाळा येथील प्रगतशील शेतकरी व सामाजिक कार्यकर्ते अशोक पोकळे यांनी घालून दिला आहे. मराठा आरक्षणाच्या लढ्यात सक्रिय भूमिका बजावत समाजकार्यात पुढे असतानाच त्यांनी शेतीमध्येही नवे प्रयोग करत केळीच्या पिकातून विक्रमी उत्पादन घेऊन थेट परदेशी बाजारपेठ गाठली आहे. त्यांच्या शेतातील सेंद्रिय पद्धतीने उत्पादित केळीची निर्यात इराण या देशातील बाजारपेठेत झाल्याने परिसरात त्यांच्या कार्याची मोठी चर्चा सुरू आहे.

सेंद्रिय पद्धतीने केळी लागवड प्रयोगातून यश अशोक पोकळे यांनी सुमारे एक हेक्टर (अडीच एकर) क्षेत्रात केळीची लागवड केली. पारंपरिक पद्धतीऐवजी त्यांनी आधुनिक तंत्रज्ञान, माती परीक्षण, संतुलित सेंद्रिय खतांचा वापर आणि आंतरपीक पद्धतीचा अवलंब केला. रासायनिक फवारणीचा अत्यल्प वापर सेंद्रिय खतांवर भर पाण्याचे नियोजनबद्ध व्यवस्थापन आंतरपीक पद्धतीने अतिरिक्त उत्पन्न या सर्व घटकांमुळे केळीचा दर्जा



उत्कृष्ट राहिला आणि उत्पादन खर्च कमी ठेवण्यात यश आले. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मागणी का वाढली? सेंद्रिय पद्धतीने उत्पादित केळीला परदेशात मोठी मागणी असते. अशोक पोकळे यांच्या केळीला इराणच्या बाजारात मागणी वाढण्याची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे: रासायनिक अवशेषांचा अभाव नैसर्गिक चव व टिकाऊपणा दर्जेदार वर्गीकरण व पॅकिंग निर्यातक्षम गुणवत्ता त्यांनी सांगितले की, योग्य नियोजन आणि दर्जा राखल्यास ग्रामीण भागातील शेतकरीही आंतरराष्ट्रीय बाजारपेठ गाठू शकतात. सामाजिक कार्य आणि शेती दोन्ही क्षेत्रात सक्रिय अशोक पोकळे हे केवळ प्रगतशील शेतकरीच नाहीत, तर सामाजिक चळवळींमध्येही सक्रिय आहेत. मराठा आरक्षणाच्या आंदोलनात त्यांनी दिलेले योगदान उल्लेखनीय मानले जाते. समाजकार्यासोबत शेतीतही त्यांनी केलेले प्रयोग युवकांसाठी प्रेरणादायी ठरत आहेत. शेतकऱ्यांसाठी संदेश : पिकांचे विविधीकरण करा अशोक पोकळे यांनी शेतकरी बांधवांना पुढील संदेश दिला: ''गहू-बाजरीपुरते मर्यादित राहू नका. केळी, फळबाग, भाजीपाला, आंतरपीक यांसारख्या पिकांचा प्रयोग करा. आधुनिक शेती तंत्रज्ञान स्वीकारल्यास शेतीतून मोठा नफा मिळू शकतो.'' ते पुढे म्हणाले की, आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय हा पर्याय नसून कष्ट, जिद्द, चिकाटी आणि योग्य मार्गदर्शन यांच्या जोरावर शेतीत निश्चित यश मिळू शकते. परिसरातील शेतकऱ्यांना नवी दिशा अशोक पोकळे यांच्या यशामुळे चिंचाळा व आष्टी परिसरातील शेतकरी नगदी पिकांकडे वळण्याचा विचार करत आहेत. विशेषतः केळी लागवड सेंद्रिय शेती निर्यातक्षम उत्पादन आधुनिक सिंचन तंत्रज्ञान या बाबींमध्ये शेतकरी रस दाखवत आहेत. निष्कर्ष अशोक पोकळे यांची यशोगाथा ही ग्रामीण शेतीच्या नव्या शक्यता दाखवणारी आहे. योग्य नियोजन, सेंद्रिय पद्धती, आधुनिक तंत्रज्ञान आणि बाजारपेठेचा अभ्यास यांच्या साहाय्याने गावातील शेतकरीही जागतिक बाजारपेठेत आपला ठसा उमटवू शकतात, हे त्यांनी सिद्ध करून दाखवले आहे. त्यांच्या या कार्यामुळे ''शेतीत काही नाही'' ही नकारात्मक मानसिकता बदलून ''शेतीत अमर्याद संधी आहेत'' हा सकारात्मक संदेश शेतकरी समाजात पोहोचत आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१९००: ब्रिटन मधे मजूर पक्षाची ची स्थापना
१८४४: डॉमिनिकन रिपब्लिकला (हैतीपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१८७४: आजच्या दिवशी इंग्लंड च्या लॉर्ड क्रिकेट मैदानावर पहिल्यांदा बेसबॉल खेळ खेळला गेला.
१९५१: अमेरिकेच्या राज्यघटनेत २१ वा बदल करण्यात आला ज्यायोगे एका व्यक्तिच्या राष्ट्राध्यक्षपदाचा जास्तीत जास्त कालावधी ८ वर्षे असा करण्यात आला.
१९८७: मराठी राजभाषा दिन
१९९९: पंधरा वर्षे सुरू असलेली लष्करी राजवट संपुष्टात येऊन नायजेरियात अध्यक्षीय निवडणूक
२००१: जमिनीवरून आकाशातील अनेक लक्ष्यांवर मारा करू शकणार्या 'आकाश' या देशी बनावटीच्या क्षेपणास्त्राची चंडीपूर तळावर यशस्वी चाचणी
२००२: मुस्लिम जमावाने अयोध्येहुन परत येणाऱ्या ५९ हिंदू यात्रेकरूंना गुजरातेतील गोध्रा येथे रेल्वेच्या डब्यात जिवंत जाळले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४८५: बंगालमधील वैष्णव संत व पंथ प्रवर्तक चैतन्य महाप्रभुंचा जन्म.
१८०७: एच. डब्ल्यू. लाँगफेलो अमेरिकन नाटककार व कवी (मृत्यू: २४ मार्च १८८२)
१८९४: कार्ल शिमट – जर्मन रसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: १३ जून १८२२)
१८९९: इन्सुलिन चे शोधक जीवरसायनशास्त्रज्ञ चार्ल्स हर्बर्ट बेस्ट यांचा जन्म. (मृत्यू: ३१ मार्च १९७८)
१९१२: मराठीतील ज्येष्ठ कवी व नाटककार वि. वा. शिरवाडकर उर्फ 'कुसुमाग्रज' यांचा जन्म, हा दिवस ''मराठी भाषा दिवस''मराठी भाषा दिवस शुभेच्छापत्रे म्हणून साजरा केला जातो.
१९२६: ज्योत्स्ना देवधर – मराठी व हिन्दी लेखिका आणि आकाशवाणी निर्मात्या (मृत्यू: १७ जानेवारी २०१३)
१९३२: एलिझाबेथ टेलर – ब्रिटिश–अमेरिकन अभिनेत्री (मृत्यू: २३ मार्च २०११)
१९४३: कर्नाटक चे मुख्यमंत्री बी.एस.येडियुरप्पा यांचा जन्म.
१९५२: भारतीय चित्रपट निर्माता प्रकाश झा यांचा जन्म.
१९७१: भारतीय उद्योजक निरव मोदी यांचा जन्म.
१९८६: भारतीय हॉकी खेळाडू संदीप सिंग यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७१२: बहादूरशाह जफर (पहिला) – मुघल सम्राट (जन्म: १४ आक्टोबर १६४३)
१८८७: आनंदीबाई गोपाळराव जोशी – भारतातील पहिल्या महिला डॉक्टर (जन्म: ३१ मार्च १८६५)
१८९२: फॅशन कंपनी लुई वूत्तोन चे डिझायनर लुई वूत्तोन यांचे निधन. (जन्म: ४ ऑगस्ट १८२१)
१९३१: काकोरी कट व लाहोर कट यातील नेते क्रांतिकारक चंदशेखर आझाद यांचा पोलिसांशी झालेल्या चकमकीत मृत्यू (जन्म: २३ जुलै १९०६)
१९३६: इव्हान पेट्रोव्हिच पाव्हलॉव्ह – चयापचय प्रक्रियेविषयी महत्त्वाचे संशोधन करणारे नोबेल पारितोषिक विजेते (१९०४) रशियन शास्त्रज्ञ (जन्म: २६ सप्टेंबर १८४९)
१९५६: भारतीय वकील आणि राजकारणी गणेश वासुदेव मावळणकर यांचे निधन. (जन्म: २७ नोव्हेंबर १८८८)
१९७६: कर्नाटक चे माजी मुख्यमंत्री के. सी. रेड्डी यांचे निधन.
१९८७: अदि मर्झबान अभिनेते, दिग्दर्शक, नाटककार व संपादक.
१९९७: श्यामलाल बाबू राय ऊर्फ 'इंदीवर' – गीतकार (जन्म: १९२४ धामणा, झांशी, उत्तर प्रदेश)
२०१०: भारतीय शिक्षक आणि सामाजिक कार्यकर्ते नानाजी देशमुख यांचे निधन. (जन्म: ११ ऑक्टोबर १९१६)

# पॉलिहाऊसमध्ये गुलाबाची लागवड करा आणि कमवा जास्तीचे पैसे

जर तुम्ही फळे आणि भाज्यांची लागवड करून कंटाळा करत असाल तर फळे आणि भाजीपाला व्यतिरिक्त गुलाबाची लागवड करून शेतकरी भरघोस नफा कमवू शकतात. शेतकरी पॉलिहाऊसमध्ये डच गुलाबाची लागवड करू शकतात. या फुलाचे वेगळेपण आहे, तज्ज्ञांच्या मते, या फुलाचा रस उसाच्या रसापेक्षा कितीतरी पटीने गोड असतो.

यासोबतच बाजारातही भरपूर मागणी आहे. या फुलाचा वापर सजावटीसाठीही केला जातो. या फुलाची लागवड शेतकऱ्यांचे नशीब बदलू शकते. पॉलिहाऊसमध्ये या फुलाच्या लागवडीसाठी अनुदानही उपलब्ध आहे. तज्ज्ञांच्या मते, एक एकरमध्ये पॉलीहाऊस उभारण्यासाठी सुमारे ७० लाख रुपये खर्च येतो. ज्यावर राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाकडून ५० टक्के अनुदान दिले जाते. या फुलाची लागवड फक्त पॉलीहाऊसमध्येच केली जाते. डच गुलाब वाढवण्यासाठी, पॉलीहाऊसमध्ये सुमारे ३२-३५ अंश सेल्सिअस तापमान असणे आवश्यक आहे. हिवाळ्यात पिकाची काढणी करणे फायदेशीर ठरते. डच गुलाबांना भारताबरोबरच जपान, नेदरलँड आणि ऑस्ट्रेलियासारख्या देशांमध्ये मागणी जास्त आहे. शेतकरी हे फूल पिकवून परदेशात पुरवठा करू शकतात. केवळ एक एकर शेतात दररोज ४५ ते ५० किलो गुलाबाची फुले येतात. जी चांगल्या किमतीत विकली जाते. या फुलाची लागवड करून शेतकरी बांधवांना दररोज १० ते २० हजार रुपयांचा नफा मिळू शकतो. राष्ट्रीय फलोत्पादन मंडळ देखील फुलांच्या उत्पादनावर उत्कृष्ट अनुदान देते. रशिया आणि युक्रेनच्या युद्धामुळं महागाईचा भडका उडाला. भारतातील भल्याभल्यांचं तर कंबरडं मोडलंच, सोबतच प्रत्येक व्यक्तीला प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे आजही याची झळ सोसावी लागत आहे. पण रशिया-युक्रेनच्या युध्दामुळं पुण्याच्या मावळमधील मुकुंद ठाकरेंना कमालीचा फायदा झाला आहे. गुलाबातून त्यांनी चांगली कमाई केली आहे.

# क्रीडा स्पर्धेत सोनाजीराव क्षीरसागर कृषी तंत्र विद्यालयाचे वर्चस्व

## कबड्डी, खो-खो, आणि रस्सीखेच स्पर्धेत पटकावला प्रथम क्रमांक

बीड

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,परभणी मान्यताप्राप्त शासकीय घटक कृषि तंत्र विद्यालय,अंबाजोगाई आणि सोनाजीराव क्षीरसागर कृषि तंत्र विद्यालय,राजुरी (नवगण) (सहसंयोजक: आष्टी, दासखेड, देवगाव आणि लुखामसला) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'कृषि विद्यापीठाच्या बीड जिल्हास्तरीय आंतर कृषि तंत्र विद्यालयीन क्रीडा महोत्सव' २०२६ अंतर्गत दि २४ फेब्रुवारी रोजी अत्यंत उत्साहात संपन्न झाला. या क्रीडा महोत्सवात सोनाजीराव क्षीरसागर कृषि तंत्र विद्यालयाच्या खेळाडूंनी अष्टपैलू कामगिरी करत कबड्डी, खो-खो आणि रस्सीखेच खेळात तसेच वैयक्तिक क्रीडा प्रकारात गोळफेक आणि ४०० मीटर धावणे यामध्ये प्रथम क्रमांक पटकावून घवघवीत यश संपादन केले.हा भव्य क्रीडा महोत्सव सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर (सौ.के.एस.के.) ऊर्फ (काकू) अन्नतंत्र व कृषि महाविद्यालय, म्हसोबा फाटा, नगर रोड बीड येथे पार पडला.या सोहळ्याचे उद्धघाटन व पारितोषक वितरण सोहळा व.ना.म.कृ.वि. परभणीचे संचालक तथा अधिष्ठाता (कृषि) मा. डॉ. भगवान आसेवार, प्रमुख पाहुणे सहयोगी अधिष्ठाता (शिक्षण) डॉ.गजेंद्र लोंढे हे होते तसेच श्री अनंत कृषि विकास प्रतिष्ठाण संस्थेचे सहसचिव डॉ. गोविंद साळुंके आणि शासकीय घटक कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य डॉ.मधुकर खळगे तसेच सर्व कृषि तंत्र विद्यालयांचे प्राचार्य यांच्या हस्ते



पार पडला.

या प्रसंगी व्यासपीठावर जिल्ह्यातील विविध कृषि तंत्र विद्यालयांचे प्राचार्य प्रा.येवले विजय (लुखामसला) प्रा.शेख फैयाज (देवगाव),प्रा.सानप जयदीप (आष्टी), प्रा.लाळगे गोवर्धन (दासखेड) तसेच सोनाजीराव क्षीरसागर कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य प्रा.सतीश पोकळे यांची प्रमुख उपस्थिती होती. या सोहळ्याचे औचित्य साधून सौ. के. एस. के (काकू) कृषि महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. रेणुका बागलाने हिची नुकतीच कृषि उपसंचालक पदी निवड झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते तिचा विशेष सत्कार करण्यात आला. तिच्या या यशामुळे उपस्थित विद्यार्थी खेळाडूंना एक नवी प्रेरणा मिळाली. बीड येथील म्हसोबा फाटा परिसरातील सौ.के.एस.के. कृषि महाविद्यालयाच्या मैदानावर पार पडलेल्या या क्रीडा महोत्सवात जिल्ह्यातील कडो विद्यार्थ्यांनी आपला क्रीडा अविष्कार सादर केला. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री अनंत कृषि विकास प्रतिष्ठाण ,राजुरी (नवगण) या संस्थेचे सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी तसेच या क्रीडा स्पर्धेसाठी पंच म्हणून लाभलेले डॉ काळे,डॉ. चौघुले डॉ. घोडके, डॉ. आवारे आणि श्री राहुल बन यांनी विशेष परिश्रम घेतले.कबड्डी, खो-खो आणि रस्सीखेच या महत्त्वाच्या सांघिक क्रीडा स्पर्धांमध्ये तसेच वैयक्तिक क्रीडा प्रकारात गोळफेक आणि ४०० मीटर धावणे यामध्ये सोनाजीराव क्षीरसागर कृषि तंत्र विद्यालयाच्या संघाने विजेतेपद पटकावल्याबद्दल संस्थेचे सचिव माजी मंत्री मा. जयदत्तजी (अण्णा) क्षीरसागर संस्थेचे सहसचिव डॉ. गोविंद साळुंके प्राचार्य सतीश पोकळे,प्रा. राठोड डी.बी,प्रा.मिसाळ डी.आर,प्रा.राजगुरू ए.के,प्रा.पाटील पी.जी, दोडमिसे अनिकेत आणि परदेशीं गणेश यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# आंब्यावरील मोहोराचे संरक्षण कसे करावे?

आंब्याच्या कलमांना सर्वसाधारणपणे ४ थ्या ते ५ व्या वर्षी आंबे लागतात. परंतु काही झाडांना दुसऱ्या वर्षीच मोहोर येतो. दुसऱ्या वर्षी आलेला मोहोर काढून टाकायचा असतो. फलधारणेसाठी त्यास वाढू द्यायचे नसते. आंब्याचे व्यापारीदृष्ट्या उत्पादन ८ व्या वर्षी चालू होते. काही झाडांवरील फळेसुद्धा विक्रीस नेतात. काही झाडांना मोहोर भरपूर येतो परंतु त्यापासून फळधारणा कमी होते. पुंकेसर असलेली फुले जर मोहोरलेल्या झाडात अधिक असतील तर ती साहजिकच गळून पडतील. तसेच मर्यादित किड्यांच्या हालचालीमुळे परागीकरण कमी प्रमाणात झाल्यास फळधारणा कमी प्रमाणात होते. तिसरे कारण म्हणजे भुरी व तुडतुड्यांपासून मोहराचे संरक्षण योग्य प्रमाणात होणे हे होय.आंब्याच्या फलोत्पादनात पीक संरक्षणास अनन्यसाधारण महत्त्व आहे. आंब्याच्या मोहरावर पडणाऱ्या किडी व रोगाचा आंबा उत्पादनावर फार मोठा परिणाम होतो. आंब्याच्या मोहरावर मुख्यत्वेकरून तुडतुडे, शेंडा पोखरणारी अळी, भुरी तसेच मिज माशीमुळे फार मोठा परिणाम होतो.

तुडतुडे उपाययोजना : ०.५ टक्के कार्बारिल किंवा फोस्फोमिडॉन ०.५ % किंवा ०.०५ % क्विनोलफॉस या कीटकनाशकांच्या फवारण्या ५ दिवसांच्या अंतराने आलटून-पालटून कराव्यात. पहिली फवारणी झाडावर मोहोर फुटू लागण्यापूर्वी करावी.शेंडा पोखरणारी अळी उपाययोजना : ०.०१ % कार्बारिल किंवा ०.५ % डायमिथोएट फवारणी झाडावर करावी. मिज माशी, उपाययोजना : ०.०५ % फोस्फोमिडॉन, ०.५ % डायमिथोएटची फवारणी करावी.मोहोरावरील भुरी रोग, उपाययोजना : या रोगाच्या नियंत्रणासाठी कीटकनाशकाच्या द्रावनामध्ये पाण्यात मिसळणारे गंधक २ ग्रॅम या प्रमाणात मिसळून फवारणी करावी. आंब्यावरील तुडतुडे, शेंडा पोखरणारी अळी आणि भुरी रोग नेहमी आंब्याच्या मोहरावर मोठ्या प्रमाणात आढळून येतात. आंबाच्या मोहोराचे संरक्षण करताना या किडींवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. तुडतुडे आंब्यावर नेहमीच आढळून येतात. मोहोर येण्यापूर्वी झाडावर कीटकनाशके, बुरशीनाशके मारणे अत्यावश्यक आहे. कारण झाडाच्या मोहोरावरील कीटकावर नियंत्रण ठेवणे अतिशय कठीण जाते. मोहोरावरील पीक संरक्षणाची योग्य ती अंमलबजावणी केली तर तुडतुडे, खोडकिडा व मिज माशी या किडीवर नियंत्रण ठेवून त्यांचा प्रतिबंध करता येतो. आंब्याला मोहोर येण्यापूर्वी खोड, फांद्या आणि पाने यावर औषधाची फवारणी करावी. राहिलेल्या चार फवारण्या पंधरा दिवसांच्या अंतराने कराव्यात. शक्यतो दर फवारणीच्या वेळेस वेगवेगळी कीटकनाशके वापरावी. कीटकनाशकाच्या बरोबर पाण्यात मिसळणारे गंधक अथवा कार्बेन्डाझिम दुसऱ्या व चौथ्या फवारणीच्या वेळी मिसळून फवारावे. कीटकनाशकाच्या निवडीबरोबर त्याची मात्रा व वेळेवर फवारणी या बाबीसुद्धा तितक्याच महत्वाच्या आहेत.

# जाणून घ्या उन्हाळी तीळ लागवड तंत्रज्ञान

तीळ हे प्राचीन काळापासूनचे महत्त्वाचे तेलबिया पीक आहे. तीळ हे पीक ८५ ते ९० दिवसात येत असल्याने खरीप हंगामासोबत उन्हाळ्यातही तीळ पिकाची लागवड केली जात आहे. खरीप हंगामात मॉन्सूनच्या लहरीपणामुळे नुकसान होत असल्याने उन्हाळी हंगामातील तीळ लागवडीस प्राधान्य दिले जात आहे. उन्हाळी हंगामामध्ये पाण्याची हमखास सुविधा असलेल्या ठिकाणी तीळ लागवड फायदेशीर ठरते. सुधारित वाण आणि लागवड तंत्राचा अवलंब केल्यास उत्पादन चांगले मिळते.

हवामान :तीळ हे अत्यंत नाजूक व संवेदनशील पीक आहे. तापमान, सूर्यप्रकाश आणि वातावरणातील आर्द्रता यांचा पीक वाढीवर परिणाम होतो. उगवणीनंतर किमान तापमान १५ अंश सेल्सिअस, कायिक वाढीसाठी २१ ते २६ अंश सेल्सिअस, तर फुलधारणा अवस्थेत २६ ते ३२ अंश सेल्सिअस तापमान आवश्यक आहे. तापमान ४० अंश सेल्सिअसच्या वर गेल्यास फुलगळ होते. वाणानुसार फुल धारणेची सुरुवात होते. पीक प्रकाशाच्या कालावधीला संवेदनशील आहे. प्रकाशाचा कालावधी जास्त असल्यास बियाण्यातील तेलाचे प्रमाण वाढते, तर प्रथिनांचे कमी होते.जमीन : मध्यम ते भारी व उत्तम पाण्याचा निचरा होणारी जमीन लागवडीस निवडावी. वालुकामय पोयट्याच्या जमिनीत पुरेसा ओलावा असल्यास हे पीक चांगले येते. जमिनीचा सामू ५.५ ते ८.० इतका असावा.

पूर्वमशागत : तिळाचे बी आकाराने लहान असते. तसेच पिकाची सुरुवातीची वाढ ही हळू



होते. त्यामुळे जमीन चांगली भुसभुशीत करून घट्ट दाबून घ्यावी. खोल नांगरट केल्यानंतर कुळवी करून जमीन भुसभुशीत करावी किंवा रोटाव्हेटरच्या साह्याने जमीन तयार करावी. पेरणीपूर्वी जमिनीवर लाकडी फळी फिरवून जमीन दाबून सपाट करून घ्यावी. उगवण चांगली होण्यास मदत मिळते.

सुधारित वाण : तीळ हे पीक हवामानातील विविध घटकांस अतिशय संवेदनशील असल्यामुळे विभाग व हंगामनिहाय शिफारशीत वाणांची पेरणीसाठी निवड करावी. उन्हाळी तिळासाठी फुले पूर्णा, ए.के.टी.- १०१ या वाणांची लागवड करावी.

पेरणी कालावधी : उन्हाळी तीळ पिकाची पेरणी १५ फेब्रुवारीपर्यंत पूर्ण करावी. पेरणी शक्यतो बैल पाभरीने करावी. पाभरीने पेरणी करताना बियाणांमध्ये बारीक वाळू किंवा चाळून घेतलेले शेणखत मिसळावे. पेरणी ३० बाय १५ सें.मी. किंवा ४५ बाय १० सें.मी. अंतरावर करावी. पेरणी करताना बियाणे २.५ सें.मी. पेक्षा जास्त खोलीवर पडणार नाही याची काळजी घ्यावी. बियाणे जास्त खोलवर पडल्यास त्याचा उगवणीवर परिणाम होतो.विरळणी : पेरणीनंतर तीन आठवड्यांच्या आत विरळणी करावी. पिकाच्या योग्य वाढीसाठी व अधिक उत्पादन मिळविण्यासाठी रोपांची संख्या २.२२ लाख प्रति हेक्टर इतकी ठेवावी. त्यासाठी ४५ सें.मी. अंतरावर पेरणी केलेली असेल, तर दोन रोपांत १० सें.मी. अंतर ठेवून विरळणी करावी. पेरणी ३० सें.मी. अंतरावर केली असल्यास, दोन रोपांतील अंतर १५ सें.मी. इतके ठेवून विरळणी करावी.

खत व्यवस्थापन : शेवटच्या कुळवणी अगोदर चांगले कुजलेले शेणखत हेक्टरी ५ ते ६ टन प्रमाणे जमिनीत मिसळावे. किंवा हेक्टरी एक टन निंबोळी पेंड पेरणीबरोबर द्यावे. तीळ पिकास नत्र ५० किलो प्रति हेक्टर देण्याची शिफारस आहे. त्यापैकी नत्राची अर्धी मात्रा म्हणजेच २५ किलो नत्र पेरणीवेळी, तर उर्वरित अर्धी मात्रा पेरणीनंतर २१ दिवसांनी द्यावी. नत्राची दुसरी मात्रा दिल्यानंतर पिकास पाणी द्यावे. हेक्टरी २५ किलो स्फुरदाची मात्रा द्यावी. जमिनीत सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता असल्यास, पेरणीच्या वेळी हेक्टरी २० किलो गंधक किंवा झिंक द्यावे.अधिक उत्पादनासाठी पीक फुलोऱ्यात आणि बोंडे वाढीच्या अवस्थेत असताना, युरिया (२ टक्के) म्हणजेच युरिया २० ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी.

आंतरमशागत : तिळाचे पीक सुरुवातीला फार हळू वाढते. रोपावस्थेत हे पीक अत्यंत नाजूक असून पिकाबरोबर वाढणाऱ्या तणांबरोबर पाणी, अन्नद्रव्यांसाठी स्पर्धाक्षम असते. त्यामुळे सुरुवातीच्या काळात तण नियंत्रण करणे आवश्यक आहे. त्यासाठी पेरणीनंतर १५ ते २० दिवसांनी पहिली कोळपणी व निंदणी करावी. तर ३० ते ३५ दिवसांनी दुसरी कोळपणी करावी. गरजेनुसार निंदणी करून पीक तणविरहित ठेवावे.

पाणी व्यवस्थापन : तीळ पीक पाण्यासाठी फारच संवेदनशील आहे. तिळाचे पीक हे पाण्याचा ताण सहन करणारे असले तरी उन्हाळी हंगामात पाण्याचा ताण पडू देऊ नये. पीक उगवणीसाठी जमिनीत पुरेशी ओल असणे आवश्यक आहे. जमिनीच्या मगदुराप्रमाणे १२ ते १५ दिवसांच्या अंतराने पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. पिकास फुले येण्याच्या तसेच बोंडे धरण्याच्या वेळेस पाण्याचा ताण पडू देऊ नये.



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत



# जिल्हाधिकारी मित्तल यांच्या हस्ते कामाचे पूजन करुन कामास सुरुवात

अंबड । प्रतिनिधी

अंबड तालुक्यात वाघलखेडा आणि सारंगपूर च्या शेतकऱ्यांच्या पुढाकाराने आकार संस्थेच्या आर्थिक मदतीने लोकसहभागातून पहिल्या बांधाऱ्याचे बांधकामाला शेतकरी, ग्रामस्थ, मा जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये जे सी बी चे पूजन करुन नारळ फोडून खोदकामला सुरुवात करण्यात आली.

जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी सर्व शेतकऱ्यांचे कौतुक करून उपस्थित सर्वांना शासकीय योजनेच्या माहिती देऊन शेतकऱ्यांच्या अडीअडचणीच्या शेत रस्ता, कोट्यावधी रुपयांचा खर्च होऊन ही कोल्हापुरी बंधाऱ्यांना दरवाजा नसल्यामुळे पाणी साचत नसल्याने संबंधित विभागाची चौकशी लावण्याचे उपस्थित अधिकाऱ्यांना आदेश देण्यात आले.



तसेच मा तहसीलदार श्री विजय चव्हाण यांनी छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियान अंतर्गत लोक कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करिता ग्राम स्तरावर सर्व प्रलंबित कामे करून घेण्यासाठी १४ मार्च पासून सुरु होणाऱ्या जनजागृती मोहीम संदर्भात सखोल माहिती दिली. वाघलखेडा येथे गट नंबर ०८ मधील ७५ फूट रुंदी असलेल्या नाल्याचे शेतकऱ्यांच्या मदतीने दगड आणि सिमेंट चा बंधारा बांधकामासाठी जे. सी. बी. द्वारे खोदकाम करिता अंबड चे मा. उपविभागीय अधिकारी श्री उमाकांत पारधी, मा. तहसीलदार श्री विजय चव्हाण, मा. गटविकास अधिकारी श्रीमती ज्योती कवडादेवी, मा. तालुका कृषी अधिकारी श्री बाळासाहेब गंडे, मा. मंडळ अधिकारी श्री सुनील कारमपुरी, मा. तलाठी श्रीमती शारदा घाटे, मा. ग्राम विकास अधिकारी श्री येमूल, शेतकरी श्री अंकुश जाधव, श्री शाम काकडे, श्री सुनील काकडे, श्री राजू डोके, श्री नामदेव राऊत, श्री उद्धव काकडे, श्री दिनेश काकडे, श्री गजानन घुगे, श्री गणेश सानप, यांची उपस्थिती होती. यासाठी गेल्या आठ महिन्यापासून शेतकरी श्री सुरेश घुगे यांनी अथक परिश्रम घेतले. आर्थिक सहकार्य करणारी आकार संस्था, राजस्थान चे श्री कृष्णा करोडिया, जलक्रांती च्या वतीने स्थानिक समन्वयक देवा चित्राल यांनी कामकाज पहिले.

# मुंबईत माझ्याविरोधात 'स्टिंग ऑपरेशन'चा कट रचला जातोय

हिंगोली । प्रतिनिधी

माझ्या विरोधात कट रचला जातोय, कारण काय तर मी गरिबांसाठी काम करतोय. मंत्रालयात स्टिंग ऑपरेशन सुरू आहे, असा खळबळजनक दावा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. हिंगोलीच्या कामठा फाटा येथे आयोजित शिवजयंतीच्या कार्यक्रमात बोलताना मनोज जरांगे पाटील यांनी हा आरोप केला आहे. मात्र आपणही काही कमी नाही असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी नाव न घेता इशाराही दिला आहे. मात्र मनोज जरांगे यांच्या या दाव्याने एकच खळबळ उडाली असून त्यांचा रोख नेमका कोणाकडे आहे, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

येत्या चार ते पाच दिवसांमध्ये फार मोठा कट हा मुंबई येथे रचला जातोय, त्यात एका महिलेचा देखील समावेश आहे. तेथे तर 'स्टिंग ऑपरेशन' सुरू आहे. मात्र आपणही काही कमी नाही, आपली देखील यंत्रणा कामाला लागली आहे. कट का रचला जातोय? तर मी फक्त गरिबांच्या लेकरांसाठी काम करतोय म्हणून. मात्र आपल्याला काही फरक पडत नसल्याचे सांगत मनोज जरांगे यांनीही इशारा दिला आहे.



हिंगोलीच्या कामठा फाटा येथे शिवजयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्यासाठी बाधित शेतकरी उपोषणाला बसले आहेत. याच शेतक-यांची मनोज जरांगे पाटील यांनी नुकतीच भेट घेतली आणि शेतक-यांशी चर्चा केली. आपले म्हणणे सरकार दरबारी मांडले पाहिजे, असेही मनोज जरांगे म्हणाले. त्याचबरोबर त्यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याशी देखील फोनवरून चर्चा केली आणि शेतक-यांचे महसूलमंत्र्यांसोबत बैठकीचे आयोजन देखील करण्यात आले आहे.

# गेवराईची माती सामाजिक मोती पिकवणारी: दत्ता बारगजे

## सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या रत्नांना सोबत घेवून काम करणार : गिताभाभी पवार

## सामाजिक धान्य बँकेच्या राष्ट्रसंत गाडगे महाराज सेवारत्न पुरस्कारांचे वितरण



गेवराई । प्रतिनिधी

गेवराईच्या मातीमध्ये सामाजिक कार्यात काम करणारे मोती पिकवण्याची ताकत आहे आणि हे मोती समाजाच्या सर्व क्षेत्रामध्ये उल्लेखनिय काम करत असून आगामी पाच वर्षात गेवराई शहरात असे पाच दहा हजार समाजसेवक निर्माण होणार असल्याचे मत इन्फंटचे दत्ता बारगजे यांनी गेवराई येथील सामाजिक धान्य बँकेच्या वतीने आयोजित संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त सेवारत्न पुरस्कार वितरण समारंभ प्रसंगी केले. समाजसेवेचा वसा घेतलेल्या आणि प्रतिकूल परिस्थितीतही इतरांच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करणाऱ्या विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा दि. २३ फेब्रुवारी रोजी राष्ट्रसंत गाडगे महाराज सेवारत्न पुरस्कारा'ने गौरव करण्यात आला.

संघर्ष सामाजिक धान्य बँक आयोजित पुरस्कार सोहळा जि.प.प्राथमिक शाळा गेवराई येथे पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून आनंदग्रामचे दत्ता बारगजे व प्रमुख उपस्थिती म्हणून नगराध्यक्षा गीताभाभी पवार, गटशिक्षणाधिकारी प्रवीणकुमार काळम पाटील, नायब तहसीलदार संजय सोनवणे, रामकुमार राव अग्रवाल, प्रीती संतोष गर्जे, कर्ण तांबे यांची लाभली होती. यावेळी अध्यक्षीय भाषणात दत्ता बारगजे यांनी संघर्ष धान्य बँकेच्या माध्यमातून काम करणाऱ्या सर्वच पदाधिकाऱ्यांचे अनेक सामाजिक कामांचे कौतुक केले. तसेच बीड जिल्ह्यात सर्वात जास्त सामाजिक क्षेत्रात काम करणारे लोक गेवराई तालुक्यात असल्याने आपल्याला या बाबीचा खुप अभिमान आहे आणि या लोकांना विश्वासात घेवून काम करणार असल्याचे यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेल्या नगराध्यक्षा गिताभाभी पवार यांनी सांगितले. संत गाडगे बाबा जयंतीचे निमित्त साधुन तालुक्यातील सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्यां रत्नांना सेवारत्न पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले यामध्ये माधवराव पवार,धनंजय सुलाखे,नामदेव चौधार, भारत चव्हाण, विकास घोडके, योगेश महाराज गायके,आप्पासाहेब महानोर, शितल साखरे, ज्ञानेश्वर पिंगळे, लातूर पॅटर्न क्लासेस गेवराई व गेवराई तालुका व्यापारी महासंघ यांचा गौरव करण्यात आला. यावेळी मान्यवरांचा परिचय समाजसेवक सुभाष काळे यांनी दिला व राष्ट्रसंत गाडगे महाराज सेवारत्न पुरस्कार सोहळ्याचे प्रास्ताविक सुरेश भोपळे यांनी केले. कार्यक्रमाचे स्वागत शिवाजी झेंडेकर तसेच आभार डॉ. संजय पांढरे यांनी केले व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धर्मराज करपे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संघर्ष सामाजिक धान्य बँकेचे संचालक बाळासाहेब गावडे, भारत साळुंखे. सुरेश नवले, भागेश्वर काळे यांनी सर्वत्र नियोजन पूर्णत्वास नेले. यावेळी सेवारत्न पुरस्कार प्राप्त मंडळीकडून संघर्ष धान्य बँकेच्या माध्यमातून काम करणाऱ्या सर्वच मंडलीची कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. विशेषत: सुभाष काळे यांच्या कामाचे सर्वच स्तरातून कौतुक करण्यात आले. तसेच आपली या पुरस्कारासाठी निवड झाल्याने अणखी जबाबदारी वाढली असल्याने सामाजिक काम करण्यास बळ व प्रेरणा मिळाली असल्याने अणखी जोमाने काम करणार असल्याच्या भावना यावेळी पुरस्कृतांकडून व्यक्त करण्यात आल्या.

# खरवंडी कासार ग्रामपंचायत भ्रष्ट कारभाराची चौकशी करण्याचे आदेश !

## खरवंडी का.शासन इनामी देवस्थान १६० एकर जमिन शासनवर्ग करण्याची मागणी

पाथर्डी प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील खरवंडी कासार ग्रामपंचायतने केलेल्या भ्रष्ट कारभाराचे तक्रार माहिती अधिकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष शैलेंद्र जायभये यांनी मुख्यमंत्री सचिवालय आणि नाशिक विभागीय आयुक्तांकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे याची गंभीर दखल घेत नाशिक विभागीय आयुक्तांनी खरवंडी कासार ग्रामपंचायतच्या भ्रष्ट कारभाराची चौकशी करण्याचे लेखी आदेश दिले आहेत या निवेदनात खरवंडी कासार ग्रामपंचायतमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुल योजनेचा भ्रष्ट कारभार उघड केला आहे यामध्ये खरवंडी कासार ग्रामपंचायतमध्ये पात्र नसणाऱ्या लाभार्थ्यांना पात्र करून घरकुलाचे बांधकाम न करता हप्ते वितरित केल्याचा आरोप केला आहे.

यामध्ये ग्रामपंचायतच्या सरपंचाच्या आणि ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या संगणमताने आर्थिक तडजोड करून घरकुल योजनेत मोठा घोटाळा केलाचा आरोप केला आहे.

तसेच २०२१ ते २०२५ यादरम्यान शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या पंधराव्या वित्त आयोगातून मिळालेल्या निधीतून करोडो रुपयांच्या निधीतून ग्रामपंचायत अंतर्गत सिमेंट काँक्रिटीकरण रस्ते पेविंग ब्लॉक बसवणे साईड गटार चेंबर इत्यादी कामात निकृष्ट दर्जाचे काम करून शासनाचा वित्त आयोगाचा लाखो रुपयांचा निधी हडप केला आहे ग्रामपंचायत पंधरावा वित्त आयोग निधीचा गैरवापर केल्यामुळे ग्रामपंचायत अधिनियम १९५९ कलम ३ प्रमाणे ग्रामपंचायतच्या दप्तर चौकशीची मागणी ही करण्यात आली आहे खरवंडी कासार हे मोठ्या महसुलीचे ग्रामपंचायत असल्याने येथे जमा होणाऱ्या ग्रामनिधीचा वापर गावातील स्वच्छता पाणी घनकचरा आणि कर्मचाऱ्यांचे पगार वेळेवर न करता ग्रामनिधी सुद्धा हडप करण्यात आला आहे .

ग्रामपंचायत विविध शासनाच्या निधी व गावांतर्गत केलेल्या विकास कामात बेकायदेशीर घेतलेले ग्रामपंचायतचे ठराव कामाच्या मोजपट्ट्या बनावट बिले याची माहिती अधिकार कायदा अधिनियम २००५ अनुसार माहिती मागवली असून खरवंडी कासार ग्रामपंचायतची भ्रष्ट कारभाराच्या चौकशीचे आदेश मुख्यमंत्री सचिवालय आणि नाशिकचे विभागीय आयुक्तांनी दिले आहेत.

> खरवंडी कासार ग्रामपंचायत अंतर्गत राम मंदिर देवस्थान ट्रस्ट २५ एकर जमीन जनार्दन स्वामी देवस्थान ट्रस्ट ६५ व एकनाथ महाराज पैठण ट्रस्ट ७० एकर जमीन असल्याने या जमिनी शासनाने इनामी किंबहुना देवस्थान जमिनीचा त्यांना दर्जा दिला असल्याने या जमिनी कमर्शियल उपयोगासाठी वापर करत असल्याचा संशय आहे सूत्रांच्या माहितीनुसार या जमिनी वहिवाटदारांनी आपसात आर्थिक तोडजोड करून ९९ वर्षाच्या करारबद्ध करून शासनाच्या देवस्थानच्या जमिनीवर बेकायदेशीरत्या अतिक्रमण केल्याची माहिती आहे यामुळे खरवंडी कासार ग्रामपंचायत इनामी देवस्थानच्या जमिनी महाराष्ट्र जमीन महसूल शासन अधिनियम १९६६ कलम ७५ अनुसार शासनवर्ग करून खरवंडी कासार अंतर्गत इनामी देवस्थानच्या जमिनीची शासनाच्या धर्मादाय आयुक्त समितीमार्फत चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हा दाखल करून कारवाई करावी
>
> –प्रा.शैलेंद्र जयाभाये,जिल्हाध्यक्ष माहिती अधिकार महासंघ अहिल्यानगर

# शक्तीपीठ महामार्गाला परभणीत तीव्र विरोध

परभणी । प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या महत्त्वाकांक्षी शक्तीपीठ महामार्ग प्रकल्पाला परभणी जिल्ह्यातील सहजपूर येथे शेतकऱ्यांनी आज (२० फेब्रुवारी) रस्त्यावर उतरून तीव्र विरोध दर्शवला. भूसंपादनाच्या प्रक्रियेमुळे संतापलेल्या शेतकऱ्यांनी आमच्या जमिनी घेण्यापेक्षा आम्हाला गोळ्या घाला, अशा टोकाच्या घोषणा देत आपला रोष व्यक्त केला. विशेष म्हणजे, अवघ्या ३५० लोकसंख्या असलेल्या या गावात प्रशासनाने ६०० हून अधिक पोलिसांचा फौजफाटा तैनात केल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला. यावर आता काँग्रेस नेते सतेज पाटील आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी सरकारवर हल्लाबोल केला आहे.

सतेज पाटील म्हणाले, गरज नसलेला शक्तीपीठ महामार्ग रेटण्यासाठी महायुती सरकारने दडपशाहीची परिसीमा गाठली आहे. परभणी जिल्ह्यात सहजापूर (जवळा) या गावामध्ये रात्रीपासून शेतकऱ्यांना अटक, घरांवर नोटिसा, आंदोलकांना ताकदीच्या बळावर ताब्यात घेणे आणि महिला भगिनींना फरपटत नेण्याचे निंदनीय प्रकार पोलीसांमार्फत सरकार करत आहे.

# लोहा कंधार ३६१ एफ राष्ट्रीय महामार्ग प्रकल्प एक्सपायर !

## एसी शेख कंट्रक्शन एजन्सी ब्लॅक लिस्ट करण्याची मागणी

पाथर्डी । प्रतिनिधी

लोहा कंधार राष्ट्रीय महामार्ग प्रकल्प ३६१ एफ खरवंडी कासार बायपास ते नवगण राजुरी जवळपास ५३ किलोमीटर असलेल्या या राष्ट्रीय महामार्गाचे काम जवळपास १० वर्षे म्हणजे एक तप पूर्ण होऊन सुद्धा अपूर्ण अवस्थेत आहेच आणि १० वर्षात जे काम केले ते अत्यंत निकृष्ट दर्जाचे केले असून खरवंडी कासार मालेवाडी श्रीपतवाडी मुंगूसवाडे भालगाव येथील या महामार्गाच्या रुंदीकरणासाठी ज्या शेतकऱ्यांच्या जमिनीचे अधिग्रहण केले गेले त्यांचा मावेजा अद्याप दिला गेला नाही सदरील लोहा कंधार राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पाचे काम करत असलेले एसी शेख कंट्रक्शन ही ठेका एजन्सी सदरील प्रकल्पाचे काम करण्यास अनुकूल नसून एसी शेख कंट्रक्शन ब्लॅक लिस्ट करण्याची मागणी होत आहे तसेच शेतकऱ्यांच्या जमिनीचा मावेजा तातडीने



द्यावा व ५० टक्के काम अपूर्ण असल्याने एसी शेख कंट्रक्शनला काम पूर्णत्वास जाऊपर्यंत देयके देऊ नये तसेच एसी शेख कंट्रक्शन ठेका एजन्सीने मुदतीत काम पूर्ण न केल्याने या ठेका एजन्सीकडून कायदेशीर दंड आकारण्यात यावा अशी मागणी भालगावचे ज्येष्ठ नेते अंकुश कासुळे यांनी केली आहे.

> लोहा कंधार राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पाचे २०१६ ते २०२६ या दहा वर्षात खरवंडी कासार ते नवगण राजुरी हे काम राष्ट्रीय महामार्ग दर्जाचे नसून केवळ जिल्हा मार्ग पद्धतीने केलेले काम आहे या खरवंडी कासार ते नवगण राजुरी ५३ किमी महामार्गात करावयाचे मोठमोठे ब्रिज केले नाही तसेच दर दहा ते पंधरा किमी अंतरावर पॅचेस अर्धवट अवस्थेत सोडून दिले आहेत यामुळे या महामार्गावर नेहमी अपघातांचे प्रमाण वाढले आहे खरवंडी कासार बायपास ते गोपीनाथ मुंडे चौक ते ढाकणवाडी फाटा येथील ड्रेनेज लाईन साईड गटार विद्युत पथदिवे असे अपूर्ण कामे आहेत राज्य सरकारच्या एमएसआरडीसीकडून ३७६ कोटी रुपये या महामार्ग प्रकल्प पूर्ण करण्यासाठी निधी दिला परंतु करोडो रुपयांचा निधी या महामार्ग प्रकल्पाच्या कामाखाली हडप करण्यात आला आहे
>
> –अंकुश कासुळे मा.सरपंच भालगाव

जाहीर प्रगटन

**मा. सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर पाटोदा, ता. पाटोदा जि. बीड यांचे न्यायालयात)**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक. ८२/२०२६**

**भाणुदास व ईतर विरुध्द निरंक**

**श्री.बी.एस. नागरगोजे.**

ज्यापेक्षा दगडु पि. भाउ चोरमले, हे दिनांक ०७/०२/२०१४ रोजी मयत झाले असुन खालील अर्जदार हे त्यांचे वारस आहेत.

१. भाणुदास पि. दगडू चोरमले,वय ८० वर्षे, धंदा शेती

२. तुळसाबाई भ्र. बारीकराव वाघुले, वय ७८ वर्षे, धंदा घरकाम, अर्जदार क्र १ यांचा पत्ता रा. रामवाडी तहत बेनसूर, ता. पाटोदा जि. बीड, अर्जदार क्र २ यांचा पत्ता रा. नायगाव, ता. पाटोदा जि. बीड

ज्याअर्थी, अर्जदार क्र १ हा मयताचा मुलगा असुन अर्जदार क्र २ ही मयताची विवाहित मुलगी आहे. या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाहीत, असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार भयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना /अर्जदारांना सदरहू मयत दगडु पि. भाउ चोरमले, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक. २३/०२/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. पु.ता.१७/०४/२०२६.

स्वाक्षरित<br>क. लिपीक<br>सह दिवाणी न्यायालय<br>क. स्तर पाटोदा

आदेशावरुन<br>स्वाक्षरित<br>सहा अधिक्षक दिवाणी न्यायालय<br>क. स्तर पाटोदा

जाहीर प्रगटन

**(मा. सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर पाटोदा, ता. पाटोदा जि. बीड यांचे न्यायालयात)**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक. ८४/२०२६**

**मच्छींद्र व ईतर विरुध्द निरंक**

**श्री.बी.एस. नागरगोजे.**

ज्यापेक्षा नवनाथ पि. परभतराव साळुंके, हे दिनांक २८/०८/२०२४ रोजी मयत झाले असुन खालील अर्जदार हे त्यांचे वारस आहेत.

१.मच्छींद्र पि. नवनाथ साळुंके, वय ४० वर्षे, धंदा शेती,

२.रविंद्र पि. नवनाथ साळुंके, वय ३६ वर्षे, धंदा शेती,

अर्जदार क्र १ व २ यांचा पत्ता, रा. नाळवंडी, ता. पाटोदा जि. बीड, ज्याअर्थी, अर्जदार क्र १ व २ हे मयताचे मुले आहेत. या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाहीत, असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना /अर्जदारांना सदरहू मयत नवनाथ पि. परभतराव साळुंके, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक. २४/०२/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. पु.ता.१७/०४/२०२६.

स्वाक्षरित<br>क. लिपीक<br>सह दिवाणी न्यायालय<br>क. स्तर पाटोदा

आदेशावरुन<br>स्वाक्षरित<br>सहा अधिक्षक दिवाणी न्यायालय<br>क. स्तर पाटोदा

# हस्तपोखरी येथील बायोफ्लॉक प्रकल्पाची जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी

जालना। प्रतिनिधी

प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजना अंतर्गत हस्तपोखरी ता. अंबड येथे जालना जिल्हात राबविण्यात येत असलेल्या पहिल्या पुर्ण झालेल्या बायोफ्लॉक मत्स्यपालन प्रकल्पास जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांनी भेट देऊन सविस्तर पाहणी केली.व प्रकल्प राबविणाऱ्या श्रीमती प्यारण घुले या लाभार्थींशी चर्चा केली. ग्रामीण भागातील युवक-शेतकऱ्यांना मत्स्यव्यवसायातून शाश्वत उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा प्रकल्प उभारण्यात आला आहे.याठिकाणी पगॅसीयस व रोहू या जातींच्या माशळी संवर्धन व मासळी वाढ केली जात आहे.

भेटीदरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी प्रकल्पात उभारण्यात आलेल्या ५० टाक्यांच्या (बायोफ्लॉक टँक) माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या आधुनिक मत्स्यपालन पद्धतीची माहिती घेतली. कमी जागेत आणि कमी पाण्यात अधिक उत्पादन देणारी ही पद्धत ग्रामीण भागासाठी फायदेशीर ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच प्रकल्पाच्या अंमलबजावणीची सद्यस्थिती, उत्पादन क्षमता, बाजारपेठ उपलब्धता व लाभार्थ्यांची आर्थिक प्रगती याबाबत सविस्तर चर्चा केली.



या प्रकल्पाची किंमत ५० लाख रुपये असून प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजनेतून ३० लाख रुपये अनुदान आहे. बायोफ्लॉक तंत्रज्ञानामुळे मत्स्यपालन अधिक शास्त्रीय पद्धतीने करता येत असून, पाण्याचा पुनर्वापर, कमी खर्चात जास्त उत्पादन आणि रोगनियंत्रण या बाबींमध्येही यश मिळत असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी मत्स्यव्यवसायिकांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या व आवश्यक त्या तांत्रिक व प्रशासकीय मदतीचे आश्वासन दिले. ग्रामीण भागातील युवकांनी अशा नाविन्यपूर्ण प्रकल्पांचा लाभ घेऊन स्वावलंबी व्हावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. यावेळी उपविभागीय अधिकारी अंबड उमाकांत पारधी,सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय अ. रा. सुरवसे,तहसीलदार विजय चव्हाण, गटविकास अधिकारी ज्योती कवडदेवी, जमील शेख, मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, जालना, डॉ रश्मी आंबुलकर, सहाय्यक मत्स्यव्यवसाय अधिकारी व संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच स्थानिक मत्स्यव्यवसायिक उपस्थित होते.

प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजनेअंतर्गत जालना जिल्ह्यात विविध ठिकाणी अशा प्रकल्पांची उभारणी करण्यात येत असून, मत्स्य उत्पादन वाढवून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्याचा प्रशासनाचा प्रयत्न असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# बत्तीस वर्षानंतर प्रकाश थेट युरोपातून हरी नाईक तांड्यावर

## एखाद्या सिनेमाला शोभेल अशी कथा : दोन वेळा स्मृतीभ्रंश, एका अपघाताने सगळं जुनं आठवलं

बीड । प्रतिनिधी

**गेवराई तालुक्यातील हरी नाईक तांड्यावरील एक युवक बत्तीस वर्षांपूर्वी रुसून घर सोडून गेला . आणि अपघातानंतर त्याला पुन्हा सर्व काही आठवले आणि ३२ वर्षानंतर तो युरोपातून थेट गेवराई तालुक्यातील हरी नाईक दांड्यावर परतला.**

अत्यंत हुशार आणि होतकरू मुलगा पण एका हट्टापायी त्याने आपलं घर सोडलं. घरापासून शाळा लांब होती, त्यामुळे रोज पायपीट करावी लागायची. त्याने वडिलांकडे सायकलचा हट्ट केला. मात्र वडिलांची परिस्थिती अत्यंत हालाकीची होती.

जेमतेम घर चालत होतं अशावेळी त्यांनी आपल्या मुलाला समजावलं. मात्र प्रकाश हट्टाला पेटले. ही घटना आहे १९९० ची. त्यावेळी ते दहावीत होते. त्यांनी वडिलांकडे सायकल मागितली, पण गरिबीमुळे ती मिळाली नाही. त्याच रागात आणि रुसवा मनात ठेवून घर सोडलं आणि मग मागे वळून पाहिलं नाही. हॉटेलमध्ये कपबश्या धुण्यापासून ते स्वतःचं शिक्षण पूर्ण करण्यापर्यंतचा त्यांचा लढा सुरू असतानाच नियतीने घाला घातला.



दिल्लीला जात असताना चोरट्यांच्या एका हल्ल्यात प्रकाश यांनी आपली स्मृती गमावली. आपलं नाव, गाव आणि आई-वडील...गाव काहीच आठवेनासं झालं. त्यांना एका आश्रमात ठेवण्यात आलं. तिथे पुन्हा हॉटेल मॅनेजमेंट करून त्यांनी कामानिमित्ताने अनेक देशांमध्ये भ्रमंती केली.

स्मृती नसतानाही गाठलं युरोप

स्वतःची ओळख पुसली गेली असली तरी काहीतरी मोठं करुन दाखवण्याची जिद्द कायम होती. एका आश्रमात वाढलेले प्रकाश आपल्या कर्तृत्वावर थेट युरोपमध्ये पोहोचले. जगभर फिरले, पैसा कमावला, पण ३२ वर्षांच्या या काळात आपल्या जुन्या आठवणी मात्र ते कायमचे विसरले होते. त्यानंतर नियतीची चक्र अशी काही फिरली की चमत्कारच म्हणावा लागेल. डिसेंबर २०२४ मध्ये माल्टा इथे वास्तव्यास असताना झालेल्या एका भीषण अपघाताने चमत्कार घडवला. उपचारादरम्यान ३२ वर्षांपूर्वीच्या सर्व आठवणी अचानक जिवंत झाल्या.

स्मृती परतताच प्रकाश यांनी आपल्या कुटुंबाचा शोध सुरू केला. सोशल मीडियाच्या मदतीने चुलत भाऊ सुभाष जाधव यांच्याशी संपर्क झाला आणि तब्बल ३ दशकांनंतर हरवलेला मुलगा सापडल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरली. जेव्हा प्रकाश आपल्या हरिलाल नाईक तांड्यावर परतले, तेव्हा संपूर्ण गावाने फटाक्यांच्या अतिषबाजीने त्यांचं स्वागत केलं. फुलांच्या पायघड्या घातल्या, त्यांचं औक्षण केलं. इतकी वर्षं परदेशात राहिल्याने प्रकाश आपली बंजारा बोली विसरले आहेत, पण मराठी, हिंदी आणि इंग्रजीवर त्यांचं प्रभुत्व आहे. परदेशात यश आणि संपत्ती मिळवूनही मायभूमीची ओढ त्यांना स्वस्त बसू देत नव्हती.

## ऐतिहासिक कमान झाडाझुडपांच्या विळख्यात ; जतनासाठी नागरिकांची मागणी

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी शहरातील बाजारपेठेच्या मध्यवर्ती भागात उभी असलेली ऐतिहासिक कमान (प्रमाणवेस) सध्या झाडाझुडपांच्या विळख्यात अडकलेली दिसत आहे. काळाच्या ओघात उगवलेल्या झाडांच्या मुळांनी व फांद्यांनी कमानीच्या संरचनेवर ताण निर्माण होत असून, या ऐतिहासिक वास्तूला धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

ही कमान आष्टीच्या ऐतिहासिक वारशाची साक्ष देणारी वास्तू मानली जाते. मात्र, योग्य देखभालीअभावी तिच्या भेगांमध्ये झाडे उगवून संरचनेचे नुकसान होत आहे. पावसाळ्यात या झाडांची वाढ अधिक वेगाने होत असल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनू शकते. शहरातील ज्येष्ठ नागरिक, इतिहासप्रेमी आणि शिवप्रेमी यांनी नगरपंचायतीने तातडीने याकडे लक्ष देण्याची मागणी केली आहे.

त्यांच्या मागण्या पुढीलप्रमाणे -

कमानीवर उगवलेली झाडे व झुडपे तात्काळ हटवावीत, वास्तूची संरचनात्मक तपासणी करून दुरुस्ती करावी, ऐतिहासिक ठेवा म्हणून संरक्षणात्मक उपाययोजना कराव्यात, परिसर स्वच्छ व आकर्षक ठेवण्यासाठी सुशोभीकरण करावे, नागरिकांचे मत आहे की, ऐतिहासिक वास्तू ही शहराची ओळख असते. तिचे जतन करणे ही नगरपंचायतीची जबाबदारी असून भविष्यातील पिढ्यांसाठी हा वारसा टिकवणे गरजेचे आहे. आता नगरपंचायत प्रशासन याकडे कितपत गांभीर्याने लक्ष देते आणि ऐतिहासिक कमान जतनासाठी कोणती ठोस पावले उचलते, याकडे आष्टीकरांचे लक्ष लागले आहे.



## पाटोदा पंचायत समितीसमोर ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे 'भिक मागो' आंदोलन संपन्न

पाटोदा । प्रतिनिधी

पंचायत समिती पाटोदा येथील गटविकास अधिकारी यांना विविध प्रलंबित प्रश्नांबाबत विनंती अर्ज देत ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी पंचायत समिती कार्यालयासमोर ठिय्या देत 'भिक मागो' आंदोलन केले. या आंदोलनात पाटोदा तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कर्मचाऱ्यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, वारंवार पाठपुरावा करूनही संबंधित प्रकरणांवर अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. विशेषतः जीपीएफ (ऋझऋ) २०२४ संदर्भातील रक्कम खात्यात जमा न होणे, वेतन व इतर देयकांमध्ये होत असलेला विलंब तसेच काही कर्मचाऱ्यांचे मार्च २०२४ चे वेतन प्रलंबित असल्याच्या मुद्द्यांमुळे कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच २०२३ सालचे प्रलंबित वेतन व इतर आर्थिक देयके तातडीने निकाली काढावीत, अशी प्रमुख मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. दीर्घकाळ प्रलंबित राहिलेल्या आर्थिक बाबींमुळे कर्मचाऱ्यांवर आर्थिक ताण वाढत असल्याचेही आंदोलकांनी यावेळी सांगितले.

यावेळी संघटनेच्या वतीने लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घेऊन प्रलंबित प्रश्न सोडवावेत, अन्यथा येत्या काळात अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला. आंदोलनादरम्यान संघटनेचे अध्यक्ष अमोल तुपे यांनी आपल्या भावना व्यक्त करत कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्यांकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी केली.

## बीड जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान राबविणार

बीड । प्रतिनिधी

महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार बीड जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान (टप्पा क्र. १) राबविण्यात येणार असून मंडळ, तालुका तसेच नगर परिषद/नगर पंचायत स्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.

महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, पारदर्शक व गतिमान करण्याच्या उद्देशाने हे अभियान हाती घेण्यात आले आहे. ग्रामीण भागातील नागरिक, शेतकरी, महिला व विद्यार्थ्यांच्या महसुली विषयांशी संबंधित प्रलंबित प्रश्नांचे तात्काळ निराकरण शिबिरांमधून करण्यात येणार आहे.

जिल्ह्यात १८ फेब्रुवारी ते ५ मार्च २०२६ या कालावधीत पूर्वतयारी करण्यात येणार आहे. त्यानंतर ७ व १४ मार्च तसेच १० व १७ एप्रिल २०२६ रोजी मंडळ स्तरावर शिबिरे घेण्यात येतील. नगर परिषद व नगर पंचायत स्तरावरील शिबिरे ८ व १५ मे २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार आहेत.

या अभियानांतर्गत भोगवटदार वर्ग-२ जमिनी वर्ग-१ मध्ये रूपांतर, 'जिवंत ७/१२' मोहिमेद्वारे नोंदी दुरुस्ती, प्रलंबित फेरफार प्रकरणांचा निपटारा, सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे आदेश वितरण, 'सर्वांसाठी घरे' अंतर्गत पट्टे वाटप, पाणंद रस्त्यांच्या मान्यता प्रक्रिया तसेच डिजिटल (टठ कोडयुक्त) ७/१२ बाबत जनजागृती करण्यात येणार आहे.

याशिवाय लोकसेवा हक्क कायद्यांतर्गत सेवा वितरण, ई-मोजणी, ॲग्रीस्टॅक, पीएम किसान सेवा व ◀◀ पान ३ वर

## पायी नर्मदा परिक्रमा पूर्ण

### ह.भ.प. गजानन शिर्के गुरव यांचा टाकळी आमीया येथे सत्कार सोहळा

आष्टी । प्रतिनिधी

नमामि देवी नर्मदे ।। या अखंड जपात आणि भगवान पांडुरंगाच्या कृपाशीर्वादाने ह. भ . प. गजानन गंगाराम शिर्के पुजारी यांनी पायी नर्मदा परिक्रमा यशस्वीरित्या पूर्ण केली. त्यानिमित्त टाकळी आमीया (ता. आष्टी, जि. बीड) येथे भव्य सत्कार, हरिकीर्तन व महाप्रसाद सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

नर्मदा परिक्रमा पूर्ण झाल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी कन्न्याभोजन, हरिकीर्तन व



महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार दि. २८ फेब्रुवारी २०२६ ◀◀ पान ३ वर

## आष्टी तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांना प्रत्येकी पाच ब्रास वाळूचे वाटप सुरू

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील पंचायत समिती कार्यालय मार्फत मंजूर झालेल्या विविध घरकुल योजनांसाठी शासन निर्णयानुसार प्रत्येकी पाच ब्रास वाळू पुरवठा करण्यात येणार असून या वाळूचे वाटप सुरू करण्यात आले आहे अशी माहिती प्रभारी तहसीलदार विनोद रणवरे यांनी दिली ..

यावेळी नायब तहसीलदार पांडुरंग माढेकर उपस्थित होते..

याविषयी अधिक माहिती देताना ते पुढे म्हणाले की, आष्टी



पंचायत समिती कार्यालयाद्वारे विविध योजनातील घरकुल लाभार्थ्यांना शासन निर्णयाप्रमाणे प्रत्येकी पाच ब्रास वाळू पुरवठा करण्यात शासन आदेश असून त्याप्रमाणे आष्टीत असेल कार्यालयाद्वारे ही वाळू वाटप सुरू करण्यात आलेले आहे आष्टी तालुक्यातील ७८१ लाभार्थ्यांना ३९०५ ब्रास वाळूचे वाटप करण्यात येणार असून तलाठी सज्जाप्रमाणे ◀◀ पान ३ वर

## दौलावडगांवमध्ये भीषण आग

### पाळीव श्वानाच्या भुंकण्यामुळे उघडकीस आली दुर्घटना

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील दौलावडगांव येथे एका शेतकरी कुटुंबाच्या बंद घराला लागलेल्या भीषण आगीत संपूर्ण संसार जळून खाक झाल्याची दुर्दैवी घटना घडली. घराला कुलूप असल्याने कुटुंब बाहेरगावी गेले होते. मात्र पाळीव श्वानाने सतत भुंकून परिसरातील नागरिकांना सतर्क केले आणि ही दुर्घटना उघडकीस आली.

मिळालेल्या माहितीनुसार, चर्मकार समाजाचे स्थानिक नेते गोपीनाथ गाडे हे मागील आठ दिवसांपासून कुटुंबासह बाहेरगावी गेले होते. मंगळवारी मध्यरात्रीच्या सुमारास त्यांच्या बंद घरातून धूर व ज्वाळा निघताना शेजाऱ्यांच्या निदर्शनास आले. पाळीव श्वानाच्या सततच्या भुंकण्यामुळे ग्रामस्थ जागे झाले आणि त्यांनी तात्काळ पोलिसांना व अग्निशमन दलाला माहिती दिली.

अहिल्यानगर येथील अग्निशमन दल, अंभोरा पोलीस व स्थानिक नागरिकांच्या मदतीने आग आटोक्यात आणण्यात यश आले. मात्र तोपर्यंत घरातील संसारोपयोगी वस्तू, इलेक्ट्रॉनिक साहित्य, स्टेशनरी तसेच इतर मालमत्ता पूर्णपणे जळून खाक झाली होती. या घटनेत लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. घटनास्थळी अंभोरा पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे, पोलीस उपनिरीक्षक आदिनाथ भडके, सहाय्यक फौजदार सोपान येवले, पोलीस हवालदार भरत माने, बाबासाहेब गर्जे, पोलीस अंमलदार शिवदास केदार तसेच वाहन चालक जयराम उबे यांनी भेट देऊन पंचनामा करत मदतकार्य केले. दरम्यान, आगीचे नेमके कारण अद्याप समजू शकले नसून पुढील तपास अंभोरा पोलीस करीत आहेत. ही घटना पाहून गाडे दाम्पत्याला मोठा मानसिक धक्का बसला असून आपला संपूर्ण संसार राख झाल्याचे पाहून त्यांना अश्रू अनावर झाले. आपल्याला हवे असल्यास मी याचे शीर्षक पर्याय, लघु बातमी, किंवा सोशल मीडिया पोस्ट स्वरूपही तयार करून देऊ शकतो.

## पोलीस पाटील भरती मधील गैरप्रकारामुळे पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात पोलीस पाटील पदासाठी भरती प्रक्रिया चालू आहे. जिल्हा प्रशासनाने ही भरती पारदर्शकतेने करायचे ठरवले होते. मात्र काही ठिकाणावरून आलेल्या तक्रारीवरून पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ड. अजित एम. देशमुख यांनी म्हटले आहे.

जिल्ह्यात मोठ्या संख्येने पोलीस पाटील पदे भरण्याचे निश्चित करण्यात आले. त्यानंतर परीक्षा केंद्रावर स्वतः जिल्हाधिकारी यांनी देखील भेटी दिल्या. त्यामुळे परीक्षा पारदर्शकतेने होईल आणि पात्र गोरगरिबांना न्याय मिळेल. पात्र व्यक्ती निवडले जातील, अशी आशा होती. मात्र काही ठिकाणच्या तक्रारीवरून बीड जिल्हा सुधारायला तयार नाही, हे स्पष्ट दिसत आहे.दरम्यान, माजलगाव येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयाने एक हजार सोळा उमेदवार पात्र ठरवून मुलाखतीसाठी यादी जाहीर केली होती. ही यादी त्यांनी पटलावर जाहीर केली. यानंतर अनेकांनी या यादीवर आक्षेप घेतले. त्यानंतर उपविभागीय अधिकारी, माजलगाव यांनी या यादीमध्ये तांत्रिक चुका झाल्याचे स्पष्ट करत मुलाखतीसाठी निवडलेल्या या उमेदवारांची यादी रद्द केली. यावरून मोठा गैरप्रकार समोर आला आहे. तांत्रिक कारण दाखवणे योग्य नाही. यादी जाहीर करताना ती जबाबदारीने जाहीर केली पाहिजे. मात्र ही जबाबदारी यादी जाहीर करताना कोठे हरवली होती ? हा देखील प्रश्न निर्माण होत आहे.तर दुसरीकडे परळी येथून प्राप्त झालेल्या तक्रारीमध्ये एका महिलेने ज्या परीक्षा केंद्रावर होमगार्ड म्हणून नोकरी केली, त्याचवेळी होमगार्ड म्हणून ड्युटी बजावत असताना पोलीस पाटील पदासाठी परीक्षा दिल्याचे उघडकीस आले आहे. या संदर्भात तक्रार देखील झालेली आहे. अशा अनेक गंभीर बाबी समोर आलीने स्वतः जिल्हाधिकाऱ्यांनी यात लक्ष घातले, तरच पात्र उमेदवारांची या पदावर निवड होणे शक्य होईल. अन्यथा प्रशासनावर जिल्हाधिकाऱ्यांनी भरोसा दाखवला, तर ते चुकीचे ठरेल. दरम्यान, या संदर्भात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडे माहिती कळविण्यात आली. त्यांनी या सर्व प्रकारची सत्यता पडताळून पाहण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे यापुढे या नोकर भरती मध्ये गैरप्रकार होऊ नयेत, अशी अपेक्षा आहे.

## राज्याच्या वनमंत्र्याकडून दिशाभूल, बीड येथे लक्ष्यवेधी आंदोलन

### चला कागदोपत्री झाडे लावूया आणि विश्वविक्रम करूया -डॉ. गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील हरित बीड अभियान अंतर्गत वृक्षलागवड प्रकरणात वनमंत्री गणेश नाईक यांनी सभागृहात दिलेल्या माहितीतून दिशाभूल केल्याचा आरोप करत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आज दि.२६ रोजी लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य, डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले.

या वेळी आंदोलनकर्त्यांनी कागदावर झाडांची चित्रे काढत चला कागदोपत्री झाडे लावूया आणि विश्वविक्रम करूया असा उपरोधिक संदेश देत प्रशासनाच्या दाव्यांचा



निषेध केला. निवेदन जिल्हाधिकारी, बीड यांच्या मार्फत वनमंत्री गणेश नाईक, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री बीड सुनेत्रा पवार, पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांना पाठविण्यात आले. आंदोलनात रामनाथ जमाले,शेख युनुस, शेख मुबीन, माजी सैनिक अशोक येडे ( जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी बीड), सय्यद सादेक (शहराध्यक्ष आम आदमी पार्टी बीड), रामधन जमाले ( बीड जिल्हाध्यक्ष इंटक बीड), किष्किंधा पांचाळ( अध्यक्ष विश्वकल्याण महिला सेवा भावी संस्था बीड), वृक्षप्रेमी अभिमान खरसाडे आदी उपस्थित होते.

दि.२५ फेब्रुवारी २०२६ रोजी विधानसभेत आ. चेतन तुपे यांनी प्रश्न उपस्थित केला असता, त्यावर उत्तर देताना वनमंत्री गणेश नाईक यांनी एका दिवसात ३० लाख नव्हे तर ६३ लाख वृक्षलागवड झाल्याचे आणि त्यापैकी ९६ टक्के झाडे जिवंत असल्याचे सांगितले. या विधानामुळे जिल्हा प्रशासनाकडून शासन व सभागृहाची दिशाभूल झाल्याचा आरोप करत आंदोलन छेडण्यात आले.डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनातून संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

## एसटी सवलत कार्डासाठी जादा वसुलीचा आरोप ; माजलगाव-बीडमध्ये प्रवाशांची आर्थिक लूट ?

माजलगाव । प्रतिनिधी

एसटी महामंडळ यांच्या प्रवासी सवलत कार्डाच्या नोंदणी प्रक्रियेस माजलगाव येथील बसस्थानकात सुरुवात झाली आहे. दररोज सकाळी ९ ते दुपारी ५ या वेळेत नोंदणी केली जात आहे.

महामंडळाने सवलत कार्डासाठी अधिकृत शुल्क १९९ रुपये निश्चित केलेले असताना, माजलगाव बसस्थानकावर प्रत्यक्षात २२० रुपये आकारले जात असल्याची तक्रार पुढे आली आहे. विशेष म्हणजे प्रवाशांना १९९ रुपयांचीच छापील पावती दिली जात असल्याने उर्वरित रक्कम कोणत्या कारणास्तव घेतली जात आहे, असा प्रश्न उपस्थित होत



आहे.

माजलगावप्रमाणेच बीड येथील बसस्थानक परिसरातही १९९ ऐवजी २०० रुपये आकारले जात असल्याची माहिती समोर आली आहे. महामंडळाने नियुक्त केलेल्या काही एजंटांकडूनच ही जादा वसुली होत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. त्यामुळे सर्वसामान्य प्रवाशांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

विशेषतः महिला प्रवाशांकडून एजंटांच्या सांगण्यावरून अतिरिक्त रक्कम घेतली जात असल्याची तक्रार आहे. बीडमध्ये एका एजंटकडून १९९ ऐवजी २२० रुपये घेतले जात असल्याचेही सांगितले जात आहे. ही अतिरिक्त रक्कम घेण्यास ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

शुक्रवार दि. २७ फेब्रुवारी २०२६ । पान ७

# मेलो तरी न्याय देत नाहीत, न्याय मागायचा तरी कुणाकडं?

## अजितदादांनी शेवटच्या श्वासापर्यंत जीवापाड जपलेल्या बारामतीकरांचा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यासाठी आक्रोश

बारामती । प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या बारामती विमानतळावरील भीषण विमान अपघातामधील निधनानंतर आमदार रोहित पवार यांनी व्हीएसआर (तडठ) व्हेंचर्स आणि नागरी विमान वाहतूक महासंचालनालय (उऋउ-) विरुद्ध मरीन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात गुन्हा (ऋखठ) दाखल करण्याचा प्रयत्न केला. मात्र, मरीन ड्राईव्ह पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यास नकार दिला. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, या अपघाताबाबत बारामती तालुका पोलीस ठाण्यात २८ जानेवारी रोजी आधीच अपघाती मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या प्रकरणाचा सखोल तपास सध्या राज्य गुन्हे अन्वेषण विभाग (उखऊ), पुणे यांच्यामार्फत केला जात आहे. त्यामुळे रोहित पवार यांचा तक्रार अर्ज पुढील कार्यवाहीसाठी राज्य सीआयडीकडे पाठवण्यात आला आहे.

दुसरीकडे, मुंबईत मरीन ड्राईव्ह पोलिसांनी गुन्हा नोंदवण्यास नकार दिल्यानंतर आज (२६ फेब्रुवारी) बारामती पोलिस ठाण्यास हजारो



समर्थकांसह रोहित पवार पोहोचले आहेत. सोबत वकिलांची सुद्धा फौज आहे. रोहित पवार यांचे वडिल राजेंद्र पवार तसेच युगेंद्र पवार सुद्धा रोहित यांच्यासमवेत आहेत. पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेण्यास विलंब करत असल्याने बारामतीकरांचा आक्रोश पोलिस ठाण्यात दिसून आला. मेलो तरी न्याय देत नाहीत, न्याय मागायचा तरी कुणाकडं? अशी हताश प्रतिक्रिया समर्थकांनी बोलताना दिली. दरम्यान, गृहमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली. राज्यातील कायदा सुव्यवस्था बिघडल्याची नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशीही मागणी केली. राजकारण इतकं खराब केलंय की माणसात माणूस ठेवला नाही मुख्यमंत्र्यांनी अशा शब्दात समर्थकांनी आपला राग व्यक्त केला. अजितदादांना न्याय मिळाला पाहिजे, देहातला आत्मा निघून गेलाय, आमच्या देवाला न्याय मिळाला पाहिजे, सरकारने लक्ष घातले पाहिजे, अशीही मागणी समर्थकांनी केली. रोहित पवार यांनी आरोप केला की, डीजीसीए व्हीएसआर कंपनीला 'क्लिन चिट' देण्याचा प्रयत्न करत आहे. विमानाची उड्डाणयोग्यता तपासणे ही डीजीसीए ची जबाबदारी असून, या प्रकरणाच्या तपासात गुंतलेल्या डीजीसीए अधिकाऱ्यांवरही कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे. डीजीसीएने व्हीएसआरच्या पाच विमानांना उड्डाणबंदी घातली होती, ज्याचा अर्थ असा होतो की ही कंपनी अपघातास जबाबदार होती, असा दावा रोहित पवार यांनी केला. खासदार सुप्रिया सुळे यांनी मागणी केली की, पुढील आठवड्यात संसदेचे अधिवेशन सुरू झाल्यावर केंद्र सरकारने अजित पवार यांचा अपघात आणि झारखंडमधील एअर म्ब्युलन्स अपघात या दोन्ही घटनांवर अधिकृत विधान करावे. या अपघातांमुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली असून, भविष्यात अपघातमुक्त हवाई प्रवास सुनिश्चित करण्यासाठी सखोल तपास आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

# पुणे जिल्ह्यात १,१५४ सहकारी संस्थांच्या निवडणुका पुन्हा सुरू

पुणे: राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका पुन्हा सुरू करण्याचे आदेश राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने मंगळवारी दिले आहेत. त्यामध्ये पुणे जिल्ह्यातील एकूण १ हजार १५४ सहकारी संस्थांचा समावेश असल्याची माहिती राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणातून देण्यात आली. त्यामध्ये पुणे शहरातील प्रलंबित असलेल्या ३४३ सहकारी संस्था आणि पुणे ग्रामीण/जिल्ह्यातील ८११ सहकारी संस्थांचा समावेश असल्याची माहिती प्राधिकरणाचे सचिव अशोक गाडे यांनी दिली.



पुणे जिल्ह्यातील 'अ' वर्ग सहकारी संस्थांच्या प्रलंबित यादीनुसार पाच संस्थांचा समावेश आहे. त्यामध्ये महाराष्ट्र राज्य केडरायझेशन को-ऑपरेटिव्ह सोसायटी (सदाशिव पेठ, पुणे), महाराष्ट्र राज्य महिला संस्थांचा महासंघ मर्यादित, द्वारा : महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित, पुणे यांचा समावेश आहे. याशिवाय दौंड तालुक्यातील भीमा सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाची दिनांक २० मे २०२० रोजीच संपलेली आहे. निवडणुकीसाठी आवश्यक असलेला निवडणूक निधी भरला न गेल्याने ही निवडणूक प्रलंबित असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, बारामती तालुक्यातील सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाची मुदत दिनांक १३ ऑक्टोबर २०२६, तर इंदापूर तालुक्यातील कर्मयोगी शंकरराव पाटील सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाची मुदत दिनांक १२ ऑक्टोबर २०२६ रोजी संपत आहे. सध्या सहकारी संस्थांच्या निवडणुकांचा कार्यक्रम सुरू झालेला असला, तरी पावसाळा सुरू झाल्यानंतर सहकारी संस्थांच्या निवडणुका लांबणीवर पडतात. त्यामुळे याच वर्षातील दुसऱ्या टप्प्यात सोमेश्वर आणि कर्मयोगी साखर कारखान्याची निवडणूक अपेक्षित असल्याचे ते म्हणाले. पुणे शहरातील निवडणुकांमध्ये अ वर्ग २, ब वर्गात २०, क वर्गात २०८ आणि ड वर्गात ११३ मिळून ३४३ सहकारी संस्थांचा समावेश आहे. तर, पुणे ग्रामीणमधील प्रलंबित संस्थांमध्ये अ वर्गातील १, ब वर्गात ३९, क वर्गात ४८९ आणि ड वर्गातील २८२ मिळून ८११ सहकारी संस्थांचा समावेश आहे.दरम्यान, जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांचा धुरळा खाली बसला आहे. आता गावगाड्यातील साखर कारखाने, विकास सोसायट्यांच्या निवडणुकांची रंगत यानिमित्ताने पाहावयास मिळणार आहे.

# मोठ्या बांधकामांवर आता सेन्सर बंधनकारक! धूळ प्रदूषण रोखण्यासाठी महापालिकेचे कठोर पाऊल

**पुणे । प्रतिनिधी**

शहरातील वाढत्या धूलिकण प्रदूषणात नव्याने सुरू असलेल्या बांधकामांचा मोठा वाटा असल्याचे लक्षात घेऊन महापालिकेने कठोर पाऊल उचलले आहे. हवेत वाढत असलेल्या पीएम २.५ व पीएम १० धूलिकणांच्या पार्श्वभूमीवर शहरातील ५ हजार चौरस मीटरपेक्षा जास्त क्षेत्रावर सुरू असलेल्या सर्व बांधकाम प्रकल्पांवर सेन्सर-आधारित हवा गुणवत्ता तपासणी प्रणाली बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे. या प्रणालीची सुरुवात बुधवारी महापालिकेत महापौरांच्या उपस्थितीत करण्यात आली.

या वेळी बांधकाम क्षेत्रातील वायू प्रदूषण नियंत्रण व उपाययोजना या विषयावर महापालिका प्रशासन, वर्ल्ड रिसोर्सेस इन्स्टिट्यूट इंडिया आणि भारतीय उष्ण कटिबंधीय हवामानशास्त्र संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. महापौर मंजुषा नागपुरे, सभागृह नेते गणेश बिडकर, महापालिका आयुक्त नवल किशोर राम, अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी., अतिरिक्त आयुक्त



पवनीत कौर, शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर, अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, क्रेडाई पुणेचे सहसचिव तेजराज पाटील, तसेच मराठी बांधकाम व्यावसायिक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. शहरात आतापर्यंत सुमारे १५३ बांधकाम प्रकल्पांवर ही यंत्रणा बसविण्यात आली असून, संबंधित व्यावसायिकांनी स्वखर्चाने सेन्सर दर्शनी भागात बसवले आहेत. त्या माध्यमातून प्रदूषणाचे रिअल-टाइम निरीक्षण महापालिकेकडून केले जाणार असल्याचे प्रात्यक्षिकही दाखविण्यात आले. वेगाने होत असलेल्या शहरीकरणामुळे बांधकाम क्षेत्रातून मोठ्या प्रमाणावर धूळ निर्माण होत आहे. ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया यांच्या २०२२ च्या अहवालानुसार पीएम १० धुलिकणांच्या उत्सर्जनात बांधकाम क्षेत्राचा सुमारे २३ टक्के वाटा आहे. त्यामुळे धूळ नियंत्रणासाठी तांत्रिक उपाययोजना करणे अत्यावश्यक ठरत असल्याचे महापालिकेकडून स्पष्ट करण्यात आले. सध्या पुण्यात ५ हजार चौरस मीटरपेक्षा अधिक क्षेत्रावर ६३८ बांधकाम प्रकल्प सुरू आहेत. त्यापैकी १५३ प्रकल्पांवर सेन्सर बसविण्यात आले असून, उर्वरित प्रकल्पांवरही येत्या काही दिवसांत ही प्रणाली बसवली जाणार असल्याची माहिती महापौर नागपुरे यांनी या कार्यक्रमानंतर पत्रकारांशी बोलताना दिली.

# आम्ही कोयता गँगचे आहोत' म्हणत २० जणांचा हल्ला; शिक्रापूरमध्ये दोन भावांना मारहाण

शिक्रापूर: शिरूर तालुक्यातील शिक्रापूर येथील तळेगाव रोड येथे कारला दुचाकी धडकून झालेल्या वादातून २० जणांच्या टोळक्याकडून 'आम्ही कोयता गँगचे आहोत' असे म्हणत शिवीगाळ, दमदाटी करीत दोघा भावांना मारहाण करण्यात आली. याप्रकरणी शिक्रापूर पोलिस ठाण्यात २० जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आर्यन गडदरे, सार्थक गावडे, अथर्व साळवे, कार्तिक सांवत, क्रिश चकोर, ओम गायकवाड, सार्थक कराळे, सोहम फिरोदिया याच्यासह १२ साथीदारांवर गुन्हा दाखल झाला आहे. याप्रकरणी श्रीकांत गोविंद



नरके (वय ३५, रा. नरकेवाडी, तळेगाव ढमढेरे, ता. शिरूर) यांनी फिर्याद दिली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, श्रीकांत नरके हे त्यांच्या कारने येत असताना पाठीमागून आलेल्या दुचाकीस्वाराने कारला धडक दिली. त्या वेळी दुचाकीवरील दोघे पळून जाऊ लागले. त्यामुळे श्रीकांतचे भाऊ राजेश यांनी दुचाकीवरील आर्यन गडदरे व सार्थक गावडे यांना पकडले. मात्र, ते दोघे राजेशला दमदाटी करू लागले. या वेळी श्रीकांत व राजेश यांनी दोघांना त्यांच्या दुकानात बसविले. त्या दोघांनी फोन करून साथीदारांना बोलावून घेतले.

काही वेळातच टोळक्याने दुकानात येत श्रीकांत व राजेश या दोघा भावांना शिवीगाळ, दमदाटी करीत 'आम्ही कोयता गँगचे आहोत...' असे म्हणत हातांनी व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली तसेच कोयत्याने मारण्याची धमकी दिली. या वेळी शेजारील दुकानदारांनी येत दोघा भावांना त्या टोळक्याच्या तावडीतून सोडविले.

दरम्यान, टोळक्याने श्रीकांतच्या गळ्यातील सोनसाखळी व दुकानातील ७० हजार रुपयांची रोकड जबरदस्तीने काढून नेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. मारहाणीची घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. याप्रकरणी पोलिस हवालदार बापू हाडगळे पुढील तपास करीत आहेत.

# क्रेनचा पट्टा तुटून सळई डोक्यात पडली; कामगार महिलेचा दुर्दैवी मृत्यू

पुणे

हडपसर येथील रामटेकडी औद्योगिक वसाहतीच्या आवारात लोखंडी जिन्याचे काम करताना क्रेनचा पट्टा तुटल्याने सळई डोक्यात पडून कामगार महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली. अपघातास जबाबदार ठरल्या प्रकरणी वानवडी पोलिसांनी क्रेन चालकासह ठेकेदाराविरुद्ध गुन्हा दाखल केला. वैशाली मारुती भोसले (वय ४७, रा. गोसावी वस्ती, हडपसर) असे मृत्युमुखी पडलेल्या




महिलेचे नाव आहे. याबाबत भोसले यांचा मुलगा चेतन मारुती भोसले (वय २१) याने वानवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, हडपसर येथील रामटेकडी औद्योगिक वसाहतीत एका खासगी कंपनीत वैशाली भोसले काम करत होत्या. कंपनीच्या आवारात मागील बाजूस लोखंडी जिना तयार करण्याचे काम १८ फेब्रुवारीला सकाळी अकराच्या सुमारास सुरू होते. वैशाली भोसले आणि सहकारी कंपनीच्या आवारातून पिण्याचे पाणी आणण्यासाठी निघाल्या होत्या. क्रेन चालक लोखंडी जिना तयार करण्यासाठी सळई उचलत होता. त्यावेळी अचानक क्रेनचा पट्टा तुटला.

पट्टा तुटल्यानंतर क्रेनने उचलेली सळई वैशाली यांच्या डोक्यात पडली. दुर्घटनेत वैशाली गंभीर जखमी झाल्या, त्यांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी पाहणी केली. क्रेन चालक, ठेकेदार यांनी पुरेशा सुरक्षाविषयक उपाययोजना न केल्याने दुर्घटना घडल्याचे चौकशीत उघड झाले. क्रेन चालक, ठेकेदार, तसेच संबधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक जाधव तपास करत आहेत.

# भीमाशंकरमध्ये 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड'ची तयारी, देशात पहिल्यांदाच असा प्रयोग

पुणे । प्रतिनिधी

कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भीमाशंकर येथील मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात येत आहे. सुमारे पावणेतीन हजार चौरस फुटांच्या सभामंडपाचे काम केवळ चार महिन्यांत पारंपरिक तंत्रज्ञानाचा वापर करून पूर्ण करण्यात येणार आहे. देशात पहिल्यांदाच अशा स्वरूपाचे जीर्णोद्धाराचे काम पुरातत्त्व विभागामार्फत करण्यात येत असून, दगडातील या बांधकामाचा गिनिज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये समाविष्ट करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेतला आहे.

खेड तालुक्यातील भीमाशंकर ज्योतिर्लिंगाच्या तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास राज्य सरकारने यापूर्वीच मान्यता दिली आहे. यासाठी २८८ कोटी १७ लाख रुपयांची मदत राज्य सरकारकडून केली जाणार आहे. केवळ सभामंडपासाठी १० कोटी रुपयांचा खर्च करण्यात येत आहे. कमी वेळेत पारंपरिक साहित्य व तंत्रांचा वापर करून, उत्कृष्ट कारागिरीच्या साहाय्याने पूर्ण झालेला हा प्रकल्प राष्ट्रीय स्तरावर आदर्श ठरणार असून, याची जागतिक पातळीवर नोंद व्हावी, यासाठी गिनीज वर्ल्ड रेकॉर्डसाठी अर्ज करण्यात येणार आहे. या सभामंडपात एकूण ४८ स्तंभ असून, मध्यभागी घुमट तयार करण्यात येणार आहे. या सभामंडपाचे एकूण क्षेत्र २ हजार ७५० चौरस फूट इतके असेल. यातील स्तंभ दोन ते तीन दगडांमध्ये पूर्ण करण्यात येणार असून, स्तंभांवर कमानी उभारल्या जाणार आहेत. त्याही तीन दगडांमध्येच पूर्ण करण्यात येणार आहेत. त्यावर असलेला घुमटदेखील तशाच पद्धतीने उभारला जाणार आहे. हा सभा मंडप तयार करण्यासाठी केवळ चार महिन्यांचा कालावधी लागणार असून, हे काम विक्रमी वेळेत पूर्ण करण्याची ही पहिलीच वेळ असणार आहे.

# एमसीए सीईटीसाठी ५५,५४२ नोंदणी; एमएचएमसीटीसाठी अवघे ५५ अर्ज

पुणे । प्रतिनिधी

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष अर्थात सीईटी सेलतर्फे मास्टर ऑफ कॉम्प्युटर प्लिकेशन (एमसीए) व मास्टर ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी (एम एचएमसीटी) या पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या सीईटीसाठी नोंदणी करण्याची मुदत संपली. मुदतीअखेर यंदा एमसीएच्या प्रवेश परीक्षेसाठी ५५ हजार ५४२, तर एम एचएमसीटीच्या प्रवेश परीक्षेसाठी यावर्षी ५५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केल्याचे स्पष्ट झाले आहे.

मागील वर्षी एमसीए सीईटी प्रवेश परीक्षेमध्ये ५६,२५७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. २०२५ पेक्षा ७१५ विद्यार्थ्यांची नोंदणी यावर्षी कमी झाली आहे. तर मागील वर्षी एम एचएमसीटीच्या सीईटी प्रवेश परीक्षेमध्ये ८० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. २०२५ पेक्षा २५ विद्यार्थ्यांची नोंदणी यावर्षी कमी झाली आहे. एमसीए या अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा दि. ३० मार्च २०२६ रोजी होणार आहे. तर, एम. एचएमसीटी या अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा २५ मार्च २०२६ रोजी होणार आहे. सीईटी संगणकाधारित पद्धतीने ऑनलाइन घेण्यात येणार आहे. २०२६ च्या सीईटीसाठी एमसीए व एम. एचएमसीटी या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सीईटी प्रवेश नोंदणीला ७ जानेवारी २०२६ पासून सुरुवात झाली होती आणि नोंदणीची अंतिम तारीख १० फेबुवारी होती. याला १८ फेबुवारीपर्यंत पहिली मुदतवाढ देण्यात आली होती तसेच दुसरी व अंतिम मुदतवाढ २३ फेबुवारीपर्यंत देण्यात आली होती. एमसीए व एम एचएमसीटी अभ्यासक्रमांच्या सीईटीसाठी ज्या विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे, त्यापैकी काही विद्यार्थ्यांकडून अर्ज भरताना अनावधानाने काही चुका झाल्या असतील तर त्या दुरुस्तीसाठीची ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. ही दुरुस्तीची सुविधा दिनांक २६ फेबुवारी ते २८ फेबुवारी २०२६ यादरम्यान उपलब्ध राहणार आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या स्वत:च्या लॉगिनमध्ये जाऊन ही दुरुस्ती करायची आहे. विद्यार्थ्यांना अर्जात त्यांचे नाव, जन्मतारीख, छायाचित्र, सही, लिंग यामध्ये बदल करता येणार असल्याचे सीईटी सेलच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

# अजित पवार यांच्या विमान अपघाताचा सीआयडी तपास योग्य दिशेने - अपर पोलीस महासंचालक सुनील रामानंद

पुणे । प्रतिनिधी

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताप्रकरणी गुन्हे अन्वेषण विभागाचा (सीआयडी) तपास योग्य दिशेने सुरू असल्याची माहिती सीआयडीचे अपर पोलीस महासंचालक सुनील रामानंद यांनी पत्रकार परिषदेत दिली. या अपघातामागे घातपात आहे का, निष्काळजीपणा झाला का, अथवा कोणते गुन्हेगारी कृत्य घडले आहे का, या तीन महत्त्वाच्या मुद्द्यांवर सखोल तपास केला जात असल्याचे त्यांनी सांगितले.

२८ जानेवारी २०२६ रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार ( -क्षळीं झ्रुरी ) मुंबईहून बारामतीकडे 'व्हीएसआर व्हेंचर्स' कंपनीच्या लिअरजेट ४५ (ङशरीक्षशीं ४५) विमानाने जात असताना बारामती विमानतळाजवळ उतरताना भीषण अपघात झाला. विमान विमानतळाशेजारील एका शेतात कोसळले आणि त्यानंतर सलग चार ते पाच मोठे स्फोट झाले. या दुर्घटनेत विमानातील सर्व पाच जणांचा मृत्यू झाला. यामध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार, सुरक्षारक्षक विदीप जाधव, क्रू मेंबर पिंकी माळी, कॅप्टन सुमित कपूर आणि को-पायलट कॅप्टन शांभवी पाठक यांचा समावेश होता. या अपघातात घातपाताचा संशय व्यक्त होताच राजकीय वातावरण ढवळून निघाले. अपघाताच्या दिवशीच राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे आमदार रोहित पवार यांनी व्हीएसआर कंपनीला ऐनवेळी क्लिनचीट देण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप केला. त्याचबरोबर, विमानाचे मूळ दोन पायलट ठरलेले असताना ऐनवेळी त्यांच्यात बदल करण्यात आल्याचाही गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी स्वतंत्र एफआयआर दाखल करण्याच्याही हालचाली सुरू असल्याचे समजते. अपघातानंतर विमान नियामक संस्था जी जी सी ए ने व्हीएसआर व्हेंचर्स कंपनीच्या चार विमानांच्या उड्डाणांवर तत्काळ बंदी घातली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणी १३ निर्धारित मुद्द्यांवर चौकशी सुरू असल्याचे जाहीर केले आहे. सदर अकस्मात मृत्यूच्या गुन्ह्याचा तपास अत्यंत बारकाईने व काटेकोरपणे करण्यात येत असल्याचे अपर पोलीस महासंचालक रामानंद यांनी स्पष्ट केले. घातपात, निष्काळजीपणा आणि गुन्हेगारी कृत्य या तीन प्रमुख शक्यतांच्या अनुषंगाने सीआयडी पथक सखोल चौकशी करत आहे. तपास पूर्ण होण्यापूर्वी कोणताही निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल, असेही त्यांनी सूचित केले. या पत्रकार परिषदेस पोलीस महानिरीक्षक सुधीर हिरेमठ आणि पोलीस अधीक्षक पी. आर. पाटील हेही उपस्थित होते.

# येरवडा जेलमध्ये कैद्याची संशयास्पद हालचाल पोलिसांनी टिपली

## झडती घेताच अधिकाऱ्यांना सापडले ५ मोबाईल, २ पॉवर बँक, चार्जिंग वायर

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील येरवडा (झींपश धशीुरवर गरळश्र) जेलच्या सीमा भिंतीलगत मोबाईल फोन सापडल्याने कारागृह पोलिसांनी १, २ व ६ बराकींमध्ये घेतलेल्या झाडाझडती मोहिमेमध्ये अधिकार्यांना अनेक धक्कादायक गोष्टी सापडल्या आहेत. कारागृह अधिकार्यांना बराकीमध्ये झाडाझडती घेतल्यानंतर ५ मोबाईल फोन, २ पॉवर बँक आणि चार्जिंग वायर आढळून आल्याने एकच खळबळ उडाली आहे. याबाबत सहायक तुरुंगाधिकारी सुनिल तुकाराम गायकवाड (वय ५५) यांनी येरवडा पोलीस ठाण्यामध्ये फिर्याद दिली आहे. त्यावरुन पोलिसांनी कैदी नौशाद बदुद्रीन शेख व इतर कैद्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार येरवडा कारागृहात समोर आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी सहायक तुरुंगाधिकारी नियमित कर्तव्यावर (झींपश धशीुरवर गरळश्र) असताना सर्कल परिसरात गस्त (झींपश धशीुरवर गरळश्र) घालत होते. यावेळी बाह्य शौचालयाच्या मागील भागात एका बंदीकडून संशयास्पद हालचाल होत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी तत्काळ त्या ठिकाणी धाव घेतली असता, नौशाद बदुद्रीन शेख याने जमिनीवर पडलेला मोबाईल त्यांच्या ताब्यात दिला. याबाबत विचारणा केली असता शेखने समाधानकारक उत्तर न देता टाळाटाळ केली आणि तेथून निघून गेला. त्यानंतर फिर्यादी अधिकाऱ्यांनी (झींपश धशीुरवर गरळश्र) संपूर्ण प्रकाराची माहिती वरिष्ठांना दिली. कारागृह उपमहानिरीक्षकांची परवानगी घेऊन २२ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४ ते साडेसहा दरम्यान विशेष झडती मोहिम राबविण्यात आली. विशेष झडतीदरम्यान बराक क्रमांक १ मधील शिक्षा बंदी नौशाद शेख याच्या बराकबाहेरील (झींपश धशीुरवर गरळश्र) बॅगेची तपासणी करण्यात आली. त्यातून 'हिरो' कंपनीचा बॅटरी व सीमकार्ड नसलेला मोबाईल आणि चार्जिंग वायर जप्त करण्यात आली. त्यानंतर बराक क्रमांक १, २ आणि ६ च्या बाह्य परिसराचीही सखोल तपासणी करण्यात आली. या झडतीत बराक १ बाहेर 'नोकीया' कंपनीचे बॅटरी व सीमकार्ड (झींपश धशीुरवर गरळश्र) नसलेले तीन मोबाईल सापडले. तसेच बराक ६ बाहेरील भागात एक मोबाईल फोन, दोन पॉवर बँक आणि चार्जिंग वायर आढळून आल्या. कारागृहात प्रतिबंधित असलेले मोबाईल व इतर इलेक्ट्रॉनिक साहित्य बाळगल्याप्रकरणी नौशाद शेख आणि अन्य कैद्यांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कुंदन सत्रे करीत आहेत.

cmyk